cmyk

## संपादकीय

### आरोग्यातील असुविधा घालविण्याची गरज

केंद्र आणि राज्य सरकार जनआरोग्याच्या विविध योजना राबवते. महात्मा फुले जन आरोग्य, आयुष्मान भारत ही त्यापैकी काही योजनांची नावे. ज्याअंतर्गत केलेल्या मदतीचे आकडे सरकार अधूनमधून जाहीर करते. योजना आणि निर्णय जाहीर करणे हे सरकारचे तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com

नवी दिशा... नवे विचार.....

email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२५४ | रविवार दि.११ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


# तांत्रीक अडचणींमुळे कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत

पुणे । प्रतिनिधी

**कापूस तयार आहे, पण विक्रीत अनेक अडचणीत येत आहेत. ओटीपीचा गोंधळ, चुकीचे मोबाईल नंबर आणि स्पेलिंगच्या त्रुटींमुळे हजारो शेतकरी कापूस विक्री प्रक्रियेत अडकले असून, अंतिम मुदत जवळ येत असल्याने चिंता वाढली आहे. हमीभावाने कापूस विक्री करण्यासाठी शेतकऱ्यांना दिलेल्या नोंदणीची अंतिम मुदत जवळ आली असून अवघे सहा दिवस शिल्लक आहेत. केंद्र व राज्य शासनाच्या धोरणानुसार हमी केंद्रावर कापूस विक्रीसाठी दि. १६ जानेवारीपर्यंत नोंदणी करणे**



**बंधनकारक करण्यात आले आहे.**

राज्यातील अनेक ठिकाणचे कापूस उत्पादक शेतकरी अद्याप नोंदणीच्या प्रतीक्षेत असल्याने आगामी काळात कापूस विक्रीसाठी त्यांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कापूस विक्रीसाठी शेतकऱ्यांना कपास किसान ॲपच्या माध्यमातून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी लागत आहे. या नोंदणीनंतरच कापूस विक्रीसाठी परवानगी दिली जाते. परवानगी मिळाल्यानंतर शेतकरी हमी केंद्रावर कापूस घेऊन जातात. मात्र प्रत्यक्ष विक्रीच्या वेळी अनेकांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. कापूस विक्रीच्या ▶▶ पान २ वर

### “ ओटीपी मिळण्यास अडथळे

ग्रामीण भागातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतावर किंवा घराजवळ मोबाईल नेटवर्क नसल्यामुळे ओटीपी वेळेत मिळत नाही. काहींना मोबाइलवरील मेसेज बॉक्स कसा तपासायचा, ओटीपी कुठे दिसतो, याचीही पुरेशी माहिती नाही. फोनवरून ओटीपी पाठवा असे सांगितले तरी समोरच्या व्यक्तीलाही नेमके काय करायचे, हे न कळल्यामुळे शेतकरी चांगलेच हैराण झाले आहेत.

### “ खरेदीच्या मुदतवाढीची मागणी

नोंदणी पूर्ण न झाल्यास हमीभावाने कापूस विक्रीची संधी गमावावी लागेल, या भीतीने शेतकरी वर्गात अस्वस्थता आहे. तांत्रिक अडचणी लक्षात घेता नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात यावी, तसेच हमी केंद्रांवर प्रत्यक्ष मदत कक्ष सुरू करावेत, अशी मागणी शेतकरी व संघटनांकडून होत आहे. एकीकडे कापसाची आवक वाढत असताना, दुसरीकडे नोंदणी आणि ओटीपी प्रक्रियेतील अडचणींमुळे विक्री प्रक्रिया खोळंबण्याचा धोका निर्माण झाला आहे. उर्वरित काही दिवसांत प्रशासनाकडून तातडीची उपाययोजना न झाल्यास कापूस खरेदी व्यवस्थेवर मोठा ताण येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे खरेदीच्या मुदत वाढीची मागणी करण्यात येत आहे.

## थोडक्यात...

### अजिंठा–वेरूळ चित्रपट महोत्सव २८ जाने.पासून

छ. संभाजीनगर : जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठी रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या अकराव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची घोषणा करण्यात आली आहे. बुधवार, दि. २८ जानेवारी ते रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान हा महोत्सव आयनॉक्स थिएटर प्रोझोन मॉल, छत्रपती संभाजीनगर येथे राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय पातळीवरील कलावंताच्या मांदियाळीत संपन्न होणार आहे. नाथ ग्रुप, एमजीएम विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण सेंटर प्रस्तुत व मराठवाडा आर्ट कल्चर व फिल्म फाउंडेशन आयोजित अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव हा सुचना एवं प्रसारण मंत्रालय, भारत सरकार व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने संपन्न होत असून प्रोझोन मॉल, कालिका स्टील व सॉलीटेअर टॉवर्स यांचे विशेष सहकार्य या फेस्टिव्हलला मिळालेले आहे. एनएफडीसी व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची सहप्रस्तुती असणार आहे.

### सरकारविरोधी पोस्ट भोवली संग्राम पाटील ताब्यात

मुंबईः ब्रिटनचे नागरिक आणि मूळचे महाराष्ट्रातील असलेले डॉ. संग्राम पाटील यांना मुंबईत दाखल होताच मुंबई गुन्हे शाखेने चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. मोदी सरकारविरोधात सोशल मीडियावर कथित आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली असल्याचे सांगितले जात आहे. डॉ. संग्राम पाटील हे ब्रिटनचे नागरिक असून ते पत्नीसमवेत भारतात आले होते. पहाटेच्या सुमारास ते मुंबईतील अदानी आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई येथे उतरताच गुन्हे शाखेने त्यांना ताब्यात घेतले. सामाजिक कार्यकर्ते डॉ. विश्वंभर चौधरी, असिम सरोदे यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये या वृत्ताला दुजोरा दिला आहे. तसेच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही याविरोधात भूमिका घेत फेसबुक पोस्ट केली आहे.

### मुंबई महाराष्ट्राची नाही’; भाजप नेत्याचे विधान

मुंबईः मुंबई हे महाराष्ट्राचे शहर नसून ते एक आंतरराष्ट्रीय शहर आहे, असे वादग्रस्त विधान तामिळनाडू भाजपचे नेते के. अण्णामलाई यांनी केले. मुंबईत भाजप उमेदवाराच्या प्रचारादरम्यान त्यांनी हे वक्तव्य केल्याने राज्याच्या राजकारणात नवा वाद पेटला आहे. अण्णामलाई यांच्या विधानावर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, अण्णामलाई यांनी १०६ हुतात्म्यांचा अपमान केला आहे, त्यांच्यावर गुन्हा दाखल करून तात्काळ अटक करा, अशी मागणी केली. भाजपचे स्टार प्रचारकच असे विधान करत असल्याने विरोधकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीकेची झोड उठवली. मुंबईच्या अस्मितेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, यावरून सत्ताधारी आणि विरोधकांत जुंपण्याची शक्यता आहे.

### फडणवीसांकडून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन ?

मुंबईः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप करत काँग्रेसने दाखल केलेल्या तक्रारीची महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने दखल घेतल्याचा दावा काँग्रेसने शनिवारी केला. राज्य निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी काँग्रेसकडून तक्रार प्राप्त झाल्याची पुष्टी केली असली, तरी या तक्रारीवर नेमकी कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबत त्यांनी स्पष्ट माहिती दिली नाही. काँग्रेसने सांगितले की, ही तक्रार २ जानेवारी रोजी मुंबई मेट्रोमधून प्रवास करत असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी एका खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीशी संबंधित आहे. या मुलाखतीत आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचा आरोप काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

# संत वामनभाऊ महाराजांचे विचार पिढ्यान् पिढ्या मार्गदर्शक-मुख्यमंत्री

## संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त कळशारोपण कार्यक्रम





पाटोदा । प्रतिनिधी

**समाजाला अध्यात्म, सदाचार आणि एकोप्याचा मार्ग दाखवणारे नाथ परंपरेतील महान संत वामनभाऊ महाराज यांचे विचार काळाच्या ओघातही अधिकच सुसंगत ठरत असून, त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश पिढ्यान्पिढ्या समाजाला मार्गदर्शन करत राहतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**

संत वामनभाऊ महाराजांच्या ५० व्या, सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, गडाचे महंत विठ्ठल महाराज, आमदार धनंजय मुंडे, सुरेश धस, मोनिका राजळे, योगेश क्षीरसागर, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, भीमराव धोंडे, शंकर देशमुख विक्रमानंद शास्त्री, स्वामी विश्वेश्वरानंदजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी मी येथे आलो आहे. हे निमंत्रण मुख्यमंत्र्याला नसून, संत वामनभाऊ महाराजांच्या एका भक्ताला ▶▶ पान २ वर

### ◆ मुंडेंना मित्र म्हणाले अन थेट हेलिकॉप्टरमध्ये...

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला मंत्री पंकजा मुंडे यांचा उल्लेख आमचे नेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या वारसदार असा केला तर धनंजय मुंडे यांचा उल्लेख माझे मित्र आणि युवा नेते असा केला. कार्यक्रम झाल्यानंतर धनंजय मुंडे यांना मुख्यमंत्री हेलिकॉप्टर मध्ये सोबत घेऊन गेले त्यामुळे पुन्हा वेगळ्या चर्चा सुरू झाल्या.

### ◆ हेलिपॅड वर कार्यकर्ता ओरडला ओ ताई अन्...

श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावरील कार्यक्रमाची सांगता झाल्यानंतर राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे हेलिकॉप्टरमध्ये पाय ठेवत असताना गर्दीतून आवाज आला ओ ताई, त्या आवाजाला पंकजा मुंडे यांनी होकार दिला. कार्यकर्ता म्हणाला फोटो काढायचा आहे. ताईने लगेच बोलावून घेतले त्याच्यासोबत फोटो काढला आणि त्यानंतर पंकजा मुंडे हेलिकॉप्टरमध्ये बसल्या.

# परभणीत कीर्तनाहून येताना भीषण अपघात; ३ वारकरी ठार

परभणी । प्रतिनिधी

**कीर्तनाहून घराकडे येताना मराठवाड्यातील परभणीत भयंकर अपघात झाला. यामध्ये तीन वारकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला आहे. दत्ता महाराज मुडेकर, माऊली महाराज कदम, प्रसाद महाराज कदम यांचा जागीच मृत्यू झाला आहे. अपघातानंतर मराठवाड्यातील वारकरी संप्रदायावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अपघाताची पोलिसांनी नोंद केली असून तपास सुरू आहे.**

परभणी–जिंतूर मार्गावर कार आणि मोटारसायकलचा शनिवारी पहाटे अपघात झाल्याची घटना घडली. या अपघातात ३ वारकऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. परभणी–जिंतूर महामार्गावर असलेल्या झरी गावाजवळ मोटारसायकल आणि कारचा



अपघात झाला. दत्ता महाराज, माऊली महाराज आणि प्रसाद महाराज हे कीर्तनाहून घराकडे जात होते. त्यावेळी काळाने घाला घातला. तिन्ही महाराज गावोगावी जाऊन कीर्तन अन् प्रवचन करत होते. मयतामध्ये ह.भ.प. माऊली दिगंबरराव कदम (३०), (रा. बोर्डी ता. जिंतूर), ह.भ.प. प्रसादराव कदम (४५, रा. बोर्डी ता. जिंतूर), ह.भ.प. दत्ता माणिकराव कऱ्हाळे (३०, रा. मुडा, ता. जिंतूर), यांचा समावेश आहे. हे तिघे ▶▶ पान २ वर

**वारकरी संप्रादायावर शोककळा**

# पोक्सो कायद्यात येणार नव्या तरतूदी

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

अल्पवयीन मुलांवरील लैंगिक अत्याचारांच्या विरोधात असलेल्या ‘पोक्सो’ कायद्याचा वाढता गैरवापर रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आता पुढाकार घेतला आहे. किशोरावस्थेतील मुला–मुलींमध्ये परस्पर संमतीने निर्माण झालेल्या प्रेमसंबंधांना या कठोर कायद्याच्या कचाट्यातून वाचवण्यासाठी कायद्यात विशेष ‘रोमिओ–ज्यूलिएट’ तरतूद समाविष्ट करण्याचे निर्देश न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. केवळ संमतीने संबंध ठेवले म्हणून तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त होऊ नये, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, पोक्सो कायदा हा मुलांच्या संरक्षणासाठी बनवलेला एक अत्यंत पवित्र कायदा आहे. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये असे दिसून आले आहे की, जेव्हा दोन किशोरवयीन मुले एकमेकांच्या प्रेमात असतात आणि त्यांच्या वयात फारसे अंतर नसते, तेव्हा कुटुंबाकडून विरोधापोटी मुलावर ▶▶ पान २ वर

# अयोध्येतील राम मंदिर परिसरात नमाज पठणाचा प्रयत्न

अयोध्या । वृत्तसंस्था

येथील राम जन्मभूमी मंदिर परिसरात शनिवारी (दि.१०) एका काश्मिरी इसमाने नमाज पठण करण्याचा प्रयत्न केल्याने खळबळ उडाली. सुरक्षा रक्षकांनी तत्परता दाखवत याला ताब्यात घेतले असून, या घटनेमुळे मंदिर परिसरातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत. दरम्यान, या प्रकरणी अद्याप अधिकृत अटकेची घोषणा करण्यात आलेली नाही. तसेच, जिल्हा प्रशासन किंवा श्री राम जन्मभूमी ▶▶ पान २ वर

# रेल्वे अधिकाऱ्यांचा ‘काळा कोट’ आता इतिहास जमा

नवी दिल्ली। वृत्तसंस्था

भारतीय रेल्वेतून आता ब्रिटिशांच्या काळातील खुणा पुसून टाकण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. रेल्वे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी अनिवार्य असलेला ब्रिटिशांच्या काळातील ‘काळा कोट’ आता यापुढे अधिकृत गणवेश राहणार नाही, अशी ▶▶ पान २ वर






# जागतिक शेतकरी महिला परिषदेचे आयोजन

## राष्ट्रपतींच्या हस्ते उद्घाटनाची शक्यता

दिल्ली । वृत्तसंस्था

**२०२६ हे महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे होत असताना, कृषी आणि अन्न क्षेत्रातील महिलांचे योगदान, आव्हानं आणि भविष्यातील नेतृत्व केंद्रस्थानी ठेवणारी जागतिक कृषी परिषद नवी दिल्लीतील पुसा येथे १२ ते १४ मार्च २०२६ दरम्यान आयोजित करण्यात येणार आहे.**

दीर्घ कालावधीनंतर होत असलेल्या या महत्त्वपूर्ण परिषदेचे आयोजन भारतीय कृषी संशोधन परिषद (आयसीएआर), ट्रस्ट फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ ॲग्रिकल्चरल सायन्सेस (टीएएएस), कन्सल्टेटिव्ह ग्रुप ऑन इंटरनॅशनल ॲग्रिकल्चरल रिसर्च (सीजीआयएआर) आणि वनस्पती जाती संरक्षण व शेतकरी हक्क प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने, विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहकार्याने केले जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या परिषदेचे उद्घाटन करण्याची



शक्यता असून, महिला शेतकरी वर्षाच्या पार्श्वभूमीवर ही परिषद ऐतिहासिक ठरण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भारतातील कृषी क्षेत्रात महिलांची वाढती भूमिका लक्षात घेता, ही परिषद धोरणात्मक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. या तीन दिवसीय परिषदेत ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१० जानेवारी २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०१.०० क्विंटल | २,४०० | २,७५३ | २,५७१ |
| ज्वारी/हायब्रिड :६५.५० क्विंटल | २,३९० | ३,४७५ | २,८४१ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १८३.०० क्विंटल | ३,८१० | ६,९०० | ६,३८४ |
| उडीद :२२.०० क्विंटल | ४,२०१ | ६,९०० | ५,८१२ |
| बाजरी: २३.०० क्विंटल | २,५०० | ३,१०० | २,७९६ |
| मुग: १३.५० क्विंटल | ६,४१० | ७,७०२ | ६,९८७ |
| सोयाबीन: १८.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ४,७५० | ६,९१० | ५,८३० |

cmyk

## अग्रलेख

# आरोग्यातील असुविधा घालविण्याची गरज

केंद्र आणि राज्य सरकार जनआरोग्याच्या विविध योजना राबवते. महात्मा फुले जन आरोग्य, आयुष्मान भारत ही त्यापैकी काही योजनांची नावे. ज्याअंतर्गत केलेल्या मदतीचे आकडे सरकार अधूनमधून जाहीर करते. योजना आणि निर्णय जाहीर करणे हे सरकारचे तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे हे प्रशासनाचे काम आहे. या सगळ्या व्यवस्था नियोजनाचा अंतिमतः उद्देश सार्वजनिक आरोग्य राखले जावे हा आहे. ते तसे राखले जाते की नाही याची पाहणी सरकार कोणत्याही परिमंडळात करणार असेल तर ती स्वागतार्ह आणि इतर परिमंडळांसाठी दिशादर्शक बाब ठरेल. एरवीही सरकारी योजनांची पूर्ती होते की नाही याची पडताळणी करणारी यंत्रणा निर्माण केली गेली का, असा प्रश्न सरकारला विचारला जात असतो. भरारी पथकाच्या निमित्ताने तशी यंत्रणा काम करणार असेल तर विशेषतः रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक स्वागत करतील.

सरकारी रुग्णालये आणि आरोग्य सेवांच्या अंमलबजावणीची पाहणी करण्यासाठी भरारी पथके नेमण्याचा निर्णय घेतल्याचे राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने माध्यमांना सांगितले. पुणे परिमंडळ स्तरावर अशी पथके नेमली गेल्याचे प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. राज्याच्या इतर परिमंडळातही ती लवकरात लवकर नेमली जातील का? कारण परिमंडळ कुठलेही असले तरी रुग्णांच्या अनुभवात साम्य आढळते. व्यवस्थांमधील उणिवांची तीव्रता स्थानिक परिस्थितीनुसार बदलू शकते इतकेच. इमारतींची अवस्था, स्वच्छता, सुरक्षितता, कर्मचार्यांची उपस्थिती यासह अनेक गोष्टींची पथके पाहणी करेल असेही सरकारने जाहीर केले आहे. लाखो लोक सरकारी आरोग्य व्यवस्थेचा लाभ घेत असतात. उणीवांमुळे गैरसोय होत असूनही अनेकांचा नाईलाज असतो. कारण खासगी आरोग्य सेवेचे दर त्यांना परवडणारे नसतात. वैद्यकीय उपचार देखील दिवसेंदिवस महागडे होत चालले आहेत. त्यामुळे समस्या त्यांच्याइतक्या क्वचितच दुसरे कोणी सांगू शकेल. अर्थात, त्यासाठी भरारी पथकांच्या पाहणीत रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी पारदर्शक संवादाचा समावेश असेल, भरारी पथके अचानक भेटी देतील. सरकार आरोग्य योजना व मोफत आरोग्य तपासणी योजना राबवते. त्यातील गरजूंना शस्त्रक्रिया आणि उपचारांची सुविधा देते. त्याचे लाभ लोकांना मिळत असतात. त्याची आकडेवारी सरकार अधूनमधून जाहीर देखील करते, पण ते जनकल्याणकारी शासनाचे कर्तव्यच आहे. त्यामुळे यशाचे श्रेय घेताना उणिवांचाही शोध घेतला जायला हवा. त्या उणिवा सरकारच्या नजरेस आणून देण्याचे माध्यम भरारी पथके बनू शकतील.

माध्यमेही लोकांच्या समस्या आणि आरोग्य सेवेतील उणिवांवर अधूनमधून प्रकाश टाकत असतात. त्यांचा जरी धांडोळा घेतला तर अनेक समस्यांची परिस्थिती वर्षानुवर्षे तशीच असल्याचे सरकारच्याही लक्षात येईल. या सगळ्या व्यवस्थेचा डॉक्टर हे कणा मानले जातात. सरकारी आरोग्य व्यवस्थेत डॉक्टर आणि विशेषज्ञांची कमतरता आढळते. त्यांची अनेक पदे रिक्त आहेत. ती भरली जातील अशा घोषणा अधूनमधून केल्या जातात. पण त्याचे पुढे काय होते ते रुग्णांना कधीच का कळत नाही? परिणामी रुग्णांच्या गर्दीने ओसंडून वाहणारी रुग्णालये भरारी पथकाला दिसली पाहिजेत. विशेषज्ञांअभावी गरजू रुग्णांची होणारी गैरसोय त्यांच्याही लक्षात यायला हवी. त्या निमित्ताने लोकांनाही ते कळू शकेल. याशिवाय उपचारास सहाय्यभूत यंत्रांची नादुरुस्ती, यंत्रे आहेत पण तंत्रज्ञ नाहीत. तंत्रज्ञ आहेत पण यंत्रे बंद आहेत अशी परिस्थिती कोणत्या ना कोणत्या सरकारी रुग्णालयात रुग्णांना अनुभवास येते.

सरकारी कर्मचाऱ्यांची काम करण्याची मानसिकता हा वादाचा विषय मानला जातो. अनेक सरकारी रुग्णालयात डॉटर-आरोग्य सेवक आणि रुग्ण वा त्यांचे नातेवाईक यांच्यात मारामारीचे प्रसंगही वारंवार उद्भवत असल्याचे आढळते. त्याचीही कारणे भरारी पथकाच्या लक्षात येऊ शकतील. भरारी पथके उद्दिष्टानुसार काम करतील, सरकारला उणीवांचा अहवाल देतील आणि त्या उणिवा दूर करण्यासाठी काम केले जाईल अशी अपेक्षा रुग्णांनी करावी का? सध्या फक्त गरीब लोक सरकारी आरोग्य सेवेचा लाभ घेतात असे मानले जाते. पण उपरोक्त निर्णयामुळे उणिवा कमी झाल्या तर इतरही लोक सरकारी आरोग्य सेवेकडे वळू शकतील.

# काँग्रेसचे उमेदवार संजय मुथा यांचा 'डोअर टू डोअर' प्रचार

**जालना । प्रतिनिधी**

**जालना महाविकास आघाडीतील काँग्रेसचे प्रभाग : सहा ड मधील उमेदवार संजय मुथा यांनी 'डोअर टू डोअर' प्रचार यंत्रणा राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी प्रभागातील विविध भागात फिरून मतदारांशी संवाद साधला.**



प्रभागातील रस्ते, स्वच्छता आणि व्यापाऱ्यांची सुरक्षा या प्रश्नांना माझे प्राधान्य असेल. आमचा लढा कोणाविरुद्ध वैयक्तिक टीका-टिपणी करण्यासाठी नसून, तो केवळ आणि केवळ प्रभागाच्या विकासासाठी आहे. या प्रभागात महाविकास आघाडीचे ध्येय प्रभागाचा विकास हेच आहे. प्रभागातील रस्ते, स्वच्छता आणि व्यापाऱ्यांच्या सुरक्षेला आमचे प्राधान्य राहील, अशी ग्वाही सर्वसाधारण प्रवर्ग (ड) मधील उमेदवार संजय मुथा यांनी दिली. सर्वांनी प्रचाराचा झंझावात निर्माण केला सराफा आहे. त्यांनी मंगळवारी असोसिएशन, कबाडी मोहल्ला, कापडा बाजार, दाणा बाजार आणि पोलास गल्ली या व्यापारी व रहिवासी भागांमध्ये 'डोअर टू डोअर' प्रचार केला. यावेळी व्यापाऱ्यांनी आणि नागरिकांनी त्यांचे ठिकठिकाणी जंगी स्वागत केले. गेल्या २५ वर्षांपासून काँग्रेसशी एकनिष्ठ असलेले आणि विविध सामाजिक-व्यापारी संस्थांचे नेतृत्व केलेले संजय मुथा यांनी मतदारांशी संवाद साधताना प्रभागाच्या विकासाची संकल्पना विशद केली. कोणावरही टीका-टिपणी करण्यापेक्षा, भागाचा विकास कसा करता येईल, यावर आमचा भर आहे, असे सांगत व्यापाऱ्यांच्या अडीअडचणींची सोडविणार असल्याचे ते म्हणाले. शहराच्या विकासासाठी नेहमीच प्रयत्न करणार आहे. मोतीबागेमध्ये सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, शहरातील रस्ते, सांडपण्याचे व्यवस्थापन यासह स्वच्छतेवर विशेष लक्ष देण्याचा त्यांचा मानस आहे. आपल्या प्रभागातील नागरिकांच्या सोडविण्यासाठी आपण नेहमी सक्रीय विविध समस्या राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# विकासासह व्यापाऱ्यांच्या सुरक्षिततेला आमचे पहिले प्राधान्य-खा.कल्याण काळे

**जालना । प्रतिनिधी**

**व्यापारी सुरक्षिततेचा मुद्दा आता निवडणूक प्रचाराच्या केंद्रस्थानी आला आहे. आज खासदार कल्याण काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत निघालेल्या प्रचार रॅलीत त्यांनी प्रभागाच्या विकासासह व्यापारांच्या सुरक्षिततेला पहिले प्राधान्य राहील अशी ग्वाही देत, संजय मुथा यांच्यासह सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करा असे आवाहन केले.**

काँग्रेसचे उमेदवार संजय मुथा, कमलाबाई भुरेवाल, इफत सलमान खान आणि नजीब अहमद मोहम्मद यांच्या प्रचारार्थ निघालेल्या अतिप्रचंड प्रचार रॅलीत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, रशीद पैलवान, राजेंद्र राख, आतिक भाई तसेच व्यापारी, उद्योजक, काँग्रेसचे पदाधिकारी आणि नागरिक हजारोच्या संख्येने सहभागी झाले होते. महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी व्यापारी वर्गाशी थेट संवाद साधला. सराफा असोसिएशन आणि दाणा बाजारातील व्यापाऱ्यांनी उमेदवार संजय मुथा यांच्यासह सर्व उमेदवारांचे स्वागत केले. खासदार काळे यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, प्रलंबित नालेसफाई आणि रस्त्यांचे प्रश्न मार्गी लावून व्यापाऱ्यांसाठी भयमुक्त वातावरण निर्माण करणे ही काँग्रेसची जबाबदारी आहे. या रॅलीमुळे संपूर्ण प्रभागात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले असून, मतदारांचा कौल महाविकास आघाडीच्या बाजूने असल्याचे जाणवत आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि गुलालाच्या उधळणीत निघालेल्या या रॅलीने विरोधकांच्या गोटात अस्वस्थता निर्माण केली आहे.

# आ.प्रकाश सोळंके यांनी डोंगरे कुटुंबीयांची भेट घेऊन केले सांत्वन

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील सोना खोटा ग्रामपंचायत अंतर्गत डोंगरेवाडी येथील मयत ऊसतोड मजूर गणेश नामदेव डोंगरे यांचा कारखान्याला अपघाती मृत्यू झाला होता. त्यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करण्यासाठी माजलगाव मतदार संघाचे आ. प्रकाश सोळंके यांनी काल बुधवार दि. ७ रोजी भेट घेत एक लक्ष रुपयाची आर्थिक मदतही केली.

वडवणी तालुक्यातील डोंगरेवाडी येथील ऊसतोड मजूर गणेश डोंगरे हे कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी आपल्या पत्नीसह धाराशिव जिल्ह्यातील लोहारा तालुक्यातील बिराजदार या कारखान्याला ऊसतोडणीसाठी गेले होते. कारखाना परिसरातच ट्रॅक्टरची टॅली अंगावर पडून अपघाती मृत्यू झाला होता. त्यांना दीड एकर शेती आहे. त्या शेतीमध्ये बाजरीच्या उत्पन्नाशिवाय काहीच येत नाही. त्यांच्या



कुटुंबामध्ये वयोवृद्ध आई वडील लहान तीन मुली असा परिवार आहे. घरातील कर्ता व्यक्ती गेल्याने हे कुटुंब उघड्यावर पडले आहे. आ. प्रकाश सोळंके यांनी त्या कुटुंबीयांची भेट घेत सांत्वन केले असून प्रशासनाला मुख्यमंत्री सहायता निधीतून तात्काळ मदत मिळण्यासाठी सदरील तहसीलदार यांना सूचना दिल्या, संबंधित कारखान्याकडून मदत मिळण्यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना बोलणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्या कुटुंबीयांना स्वतःहून एक लक्ष रुपयाचा निधीही दिला. त्यांच्या समवेत ज्येष्ठ नेते सर्जेराव काळे, सभापती कल्याणराव आबूज, तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, नगराध्यक्ष शेषेराव जगताप, युवा नेते बाबरी मुंडे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष अॅड. माधव शेंडगे, युवा तालुकाध्यक्ष विकास मुंडे, शहराध्यक्ष गणेश म्हेत्रे, माजी सरपंच लखन महागोविंद, सरपंच भागवत गोंडे, सरपंच विलास वडणे, अंगद घुगे यांच्यासह आदी उपस्थित होते.

# निकोप आरोग्यासाठी सेंद्रिय शेती वरदान-डॉ.सोमीनाथ खाडे



**पाटोदा । प्रतिनिधी**

**निकोप आरोग्यासाठी सेंद्रीय शेती वरदान असल्याचे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक प्राध्यापक डॉ. सोमीनाथ खाडे यांनी केले.**

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाच्या पाटोदा येथील कला व विज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर मौजे बांगरवाडी येथे चालू असून या हिवाळी शिबिराला डॉ. सोमीनाथ खाडे यांनी आज उशीरा सायंकाळी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी ग्रामस्थ आणि स्वयंसेवकांसमोर ते बोलत होते. या सदिच्छा भेटीत डॉ. सोमीनाथ खाडे यांनी गावकऱ्यांना मार्गदर्शन करून राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात झालेल्या सर्व उपक्रमांची माहिती घेतली. यावेळी ग्रामस्थ सर्वश्री महादेव काळे, उत्तम काळे, बिरोबा काळे, बंडोपंत काळे, उमाजी काळे, विशाल काळे, गणेश काळे, पोपट काळे यांच्यासह स्वयंसेवक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकार श्री. गर्जे, महाविद्यालयाचे प्रा. पापाजी चव्हाण प्रा. डॉ. नारायण फुन्ने आदींची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. विश्वास कदम, प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनवरून महाविद्यालयाच्या रासेयोचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. बंडू लोखंडे व कार्यक्रमाधिकारी प्रा. बापू घोक्षे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी ग्रामस्थ, स्वयंसेवक उपस्थित होते.

# बीड जिल्हा काँग्रेस चिटणीस पदी अॅड.विशाल मस्के यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

**देशभरात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने संघटनात्मक बांधणी मजबुत करण्याकरीता कंबर कसली असुन तळागाळातुन पक्ष मजबुतीकरणाचे काम पक्षाचे राष्ट्रीय नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, सोनिया गाँधी यांचे मार्गदर्शनाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष मल्लीकार्जुन खर्गे यांचे अध्यक्षतेखाली वेगात चालु आहे. त्यातच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमीटी च्या अध्यक्ष स्थानी हर्षवर्धन सपकाळ यांची निवड झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या आणि सध्या तर हर्षवर्धन सपकाळ यांनी पक्षाची संघटनात्मक बांधणी व पक्ष वाढीसाठी घेतलेल्या अनेक धाडसी निर्णयांमुळे तर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलली असुन काँग्रेस पक्षावर जनतेचा विश्वास दिवसेंदिवस वाढलेला दिसत आहे.**

बीड जिल्ह्याबद्दल बोलायचे झाले तर प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचे बीड जिल्ह्याकडे विशेष लक्ष असल्याचे दिसुन येते, त्यातच बीड जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या नेत्या खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमीटीचे सरचिटणीस युवा नेते आदित्य पाटील, बीड जिल्हा काँग्रेस कमीटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे पाटील यांचे नेतृत्वात जिल्ह्यातील काँग्रेस संघटनात्मक दृष्ट्या बहरली असुन जिल्हास्तरावरून पक्षातील नेते, आणि कार्यकर्त्यांना बळ देण्यात येत आहे. अशातच दि. ०८/०१/२०२६ रोजी अखिल भारतीय काँग्रेस कमीटीच्या सचिव तथा मराठवाडा विभागाच्या सहप्रभारी मा. श्री. रेहाना चिस्ती, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमीटीचे सरचिटणीस तथा पिंप्री-चिंचवड निवडणूक प्रभारी मा. आदित्यदादा पाटील, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमीटीचे सरचिटणीस दादासाहेब मुंढे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमीटीचे सरचिटणीस गणेश राऊत, माजलगाव विधानसभा प्रभारी श्रीम. रेखाताई चव्हाण, जिल्हाध्यक्ष राहुलभैया सोनवणे पाटील यांचे हस्ते अॅड. विशाल मस्के यांची बीड जिल्हा काँग्रेस कमीटीचे चिटणीस पदी निवड करण्यात आली आहे. यावेळी जेष्ठ काँग्रेस नेते नवनाथ बापु थोटे, जिल्हा उपाध्यक्ष प्रविणकुमार शेप, महिला जिल्हाध्यक्ष मिनाक्षी ताई पांडुळे, बीड तालुकाध्यक्ष गणेशदादा बजगुडे, केज तालुकाध्यक्ष प्रविणकुमार खोडसे, पाटोदा तालुकाध्यक्ष राहुलभैया जाधव, यांसह जिल्ह्यातील सर्व तालुका व जिल्हास्तरावरील नेते, कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# आदर्श शिक्षक विष्णु गंगावणे यांचा भागवत दराडे व मित्रपरिवाराकडुन सत्कार

**दिंद्रुड। प्रतिनिधी**

**बीड जि.प.आदर्श शिक्षक प्राप्त झाल्याबद्दल म्हातारगाव जि.प.प्रा. शाळेचे शिक्षक विष्णु गंगावणे यांचा देवठाणा-जैतापुरचे सरपंच युवानेतृत्व भागवत दराडे व मित्रपरिवाराने नुकताच सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या.**

बीड जि.प.च्या वतीने शिक्षक दिनाच्या औचित्याने प्रतिवर्षी जिल्ह्यातील आदर्श शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.यावर्षीचा बीड जि.प.आदर्श शिक्षक पुरस्कार धारूर तालुक्यातील म्हातारगाव जि.प.प्राथमिक शाळेचे कर्तव्यदक्ष शिक्षक विष्णु रंगनाथ गंगावणे यांना जाहीर करण्यात आला होता.सदर पुरस्काराचे वितरण दिनांक.१ जानेवारी रोजी बीड येथे एका शानदार समारंभात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या हस्ते व माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्यासह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.हा आदर्श शिक्षक पुरस्कार विष्णु गंगावणे सर यांना मिळाल्याबद्दल त्यांचा देवठाणा-जैतापुर ग्रुप ग्राम पंचायत सरपंच तथा युवानेतृत्व भागवत दराडे यांनी सत्कार करून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्यासोबत गणेश सोळंके, नितीन सोळंके, मंगेश सोळंके, धनराज चौरे, हनुमंत दराडे, संदिप कांबळे, करण कटारे, लक्ष्मण केकान आदि होते.विष्णु गंगावणे सर हे यापुर्वी देवठाणा जि.प.प्रा.शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत होते.या शाळेत ते शिस्तप्रिय व विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून ओळखले जात होते.त्यामुळे त्यांना मिळालेला पुरस्कार हा सार्थ असल्याची प्रतिक्रिया भागवत दराडे यांनी व्यक्त केली.

# बीड मध्ये साकारणार ताल यज्ञ

**बीड । प्रतिनिधी**

ताल साधना म्युझिक सर्कल, बीड या संस्थेतर्फे दिनांक १२/०१/२०२६ सोमवार रोजी तबला प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.बनारस घराण्याचे सुप्रसिद्ध तबला वादक पंडीत अरविंदकुमार आझाद हे या कार्यशाळेला उपस्थित राहणार आहेत.



बनारस घराण्याची वादन शैली, रियाजाची शास्त्रीय पद्धत, तबला सोलो आणि साथसंगत या सर्व विषयावर गुरुजींचे मार्गदर्शन व बनारस घराण्याच्या काही रचना वादनाच्या माध्यमातून शिकवणार आहेत. गुरुजी सोबत वाजवण्याचा आनंद सर्व तबला वादकाला मिळणार आहे. असा आगळा वेगळा ताल यज्ञ बीड मध्ये पहिल्यांदाच होत असून आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व बनारस घराण्याचे सुप्रसिद्ध तबला वादक पंडीत अरविंदकुमार आझाद हे बीड मध्ये पहिल्यांदाच येत असून ही बीड मधील संगीत प्रेमी साठी खुप मोठी मेजवानी आहे. या ताल साधनेसाठी पुणे, अहिल्यानगर, संभाजीनगर, धाराशिव, माजलगाव, अंबाजोगाई, जालना, अंबड, लातूर अशा अनेक जिल्ह्यातून तबला साधक विद्यार्थी येणार आहेत. या ताल यज्ञाचे आयोजन पंडीतजींचे शिष्य प्रकाश मानूरकर यांनी केले आहे. या कार्यक्रमात पंडितजींच्या सर्व शिष्यातर्फे गुरुपुजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सर्व कार्यक्रम बीड मध्ये प्रभुलीला निवास, संत नामदेव नगर, धानोरा रोड, येथे १२/०१/२०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे.

## पान १ वरून...

### तांत्रीक अडचणींमुळे कापूस

अंतिम टप्प्यात शेतकऱ्याच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर ओटीपी पाठवला जातो. हा ओटीपी मिळाल्यानंतरच संपूर्ण माहिती अद्ययावत होते आणि कापूस विक्रीची पावती तयार होते. मात्र याच ओटीपी प्रक्रियेमुळे अनेक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. नोंदणी करताना अनेक शेतकऱ्यांनी स्वतःचा मोबाईल क्रमांक न देता मुलांचा, घरातील सदस्यांचा किंवा सीएससी केंद्रचालकांचा मोबाईल क्रमांक दिला आहे. परिणामी ओटीपी त्या क्रमांकावर जातो. याची माहिती अनेक शेतकऱ्यांना नसल्याने ओटीपी शोधण्यातच वेळ जात असून काही वेळा ओटीपीची वैधताच संपते.

-------------

### संत वामनभाऊ महाराजांचे विचार

आणि गहिनीनाथ गडाच्या सेवकाला विठ्ठल महाराजांनी दिलेले आहे, या भावनेतून मी येथे उपस्थित आहे. नाथ परंपरेतील महान संत आणि शंकराचा अवतार मानले जाणारे संत वामनभाऊ महाराज हे समाजाला दिशा देणारे सद्गुरु होते. दऱ्याखोऱ्यांतून प्रवास करत त्यांनी भागवत पंथाचा प्रचार केला आणि समाजात एकोप्याचा संदेश दिला. मन शुद्ध असेल तर आचरण शुद्ध होते हा विचार त्यांनी समाजमनात रुजवला. त्यांच्या उपदेशामुळे चोरसुद्धा चोरी सोडून माळकरी झाले, ही त्यांची अलौकिक किमया होती, असे त्यांनी सांगितले. संत वामनभाऊ महाराजांना वाचासिद्धी होती, असे सांगितले जाते. त्यांच्या कीर्तनातून आणि विचारातून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत अध्यात्म पोहोचले. कितीही पिढ्या बदलल्या तरी त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. प्रसाद वितरणाची परंपरा हे संत वामनभाऊ महाराजांचे मोठे वैशिष्ट्य असून, जिथे-जिथे सप्ताह होतो तिथे भाविकांसाठी पोटभर जेवणाची व्यवस्था केली जाते. पुढील सप्ताहासाठी विविध गावांतून मोठ्या प्रमाणावर मागणी असणे ही संत वामनभाऊ महाराजांच्या कृपेची साक्ष असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी शासनाच्या योजनेअंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली असून, ती टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहेत. पंढरपूर येथे आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, पालखी मार्गाच्या विकासासाठीही लवकरच काम करण्यात येईल, असे आश्वासन देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर गहिनीनाथ गडाचा एक अनुयायी म्हणून येथील सर्व विकासकामांची जबाबदारी लोकप्रतिनिधींसह मिळून पार पाडली जाईल. दरवर्षी संधी मिळेल तेव्हा गहिनीनाथ गडावर येऊन संत वामनभाऊ महाराजांचा आशीर्वाद घेत राहीन, असे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ महाराजांनी कठीण काळात माणसाला माणूस बनवण्याचे संस्कार समाजाला दिले. सत्य, एकोपे आणि सेवाभावाचे हे संस्कार आजही महाराष्ट्रभर जिवंत आहेत. कष्टकरी, गरीब आणि वंचित समाज वामनभाऊ महाराजांचे विचार विसरलेला नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथ गडाच्या विकासाला भव्य स्वरूप मिळत असून, हे कार्य भाविकांच्या श्रद्धेला साजेसे ठरत आहे. सामान्य माणसाच्या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी केलेले हे कार्य निश्चितच लोकांचा आशीर्वाद मिळवून देणारे आहे असा उल्लेख त्यांनी केला.

------------

### पोक्सो कायद्यात येणार

या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला जातो. अशा प्रकारे सूड उगवण्यासाठी कायद्याचा वापर होणे ही चिंतेची बाब असून यामुळे अनेक होतकरू तरुणांचे आयुष्य जेलमध्ये वाया जात असल्याचे न्यायालयाने नमूद केले. या संदर्भात भाष्य करताना न्यायालयाने केंद्र सरकारला असे सूचित केले की, ज्या प्रकरणांमध्ये दोन्ही बाजू अल्पवयीन आहेत आणि त्यांचे संबंध परस्पर संमतीवर आधारित आहेत, तिथे कायद्याची कठोरता थोडी शिथिल व्हायला हवी. तसेच, जे लोक वैयक्तिक वैमनस्यातून किंवा बदल्याच्या भावनेतून या कायद्याचा गैरवापर करतात, त्यांच्यावरही कठोर कारवाई करण्याची तरतूद असायला हवी. अलाहाबाद उच्च न्यायालयाचा एक जुना आदेश रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, वयाचा निकष हा खटल्याच्या सुनावणीचा भाग आहे, तो केवळ जामिनासाठी अनिवार्य करू नये. शेवटी न्यायालयाने वकिलांनाही एक महत्त्वाचे आवाहन केले. खोट्या तक्रारींच्या माध्यमातून कोणाचे तरी आयुष्य उद्ध्वस्त होत असेल, तर वकिलांनी तिथे योग्य भूमिका बजावली पाहिजे. यामुळे न्यायव्यवस्थेवरील सर्वसामान्य जनतेचा विश्वास अधिक दृढ होईल. आता केंद्र सरकार या सूचनेवर काय पावले उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

-----------

### रेल्वे अधिकाऱ्यांचा 'काळा

घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. ही वेशभूषा इंग्रजांनी सुरू केली होती, परंतु आता ती आजपासूनच समाप्त करण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दिल्लीत आयोजित ७० व्या अति विशिष्ट रेल्वे सेवा पुरस्कार सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी रेल्वेमंत्र्यांनी कर्मचाऱ्यांना वसाहतवादी विचार सोडून देऊन नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान आणि भारतीय समाधानांवर विश्वास ठेवण्याचे आवाहन केले. हा काळा सूट आतापर्यंत केवळ मोठ्या तपासणी मोहिमा, परेड आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत विशेष प्रसंगी घातला जात असे. हा नवा नियम ग्रुप-डी कर्मचारी, ट्रॅकमन आणि तांत्रिक स्टाफवर लागू होणार नाही.

------------

### अयोध्येतील राम मंदिर परिसरात

तीर्थ क्षेत्र ट्रस्टकडून या घटनेवर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. सुरक्षा सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित इसम सकाळी गेट क्रमांक १ मधून मंदिर परिसरात दाखल झाला होता. रामलल्लाचे दर्शन घेतल्यानंतर तो मंदिर संकुलातील सीता रसोई भागाकडे गेला. तेथे दक्षिण परिमिती भिंतीजवळ बसून त्याने प्रार्थनेची (नमाज) तयारी सुरू केली. सुरक्षा रक्षकांनी त्याला अडवण्याचा प्रयत्न केला असता त्याने धार्मिक घोषणा देण्यास सुरुवात केली. सुरक्षा रक्षकांनी त्याला पकडून तातडीने पोलिसांच्या स्वाधीन केले. ताब्यात घेण्यात आलेल्या इसमाचे नाव अबू अहमद शेख आहे. तो जम्मू-काश्मीरमधील शोपियान जिल्ह्याचा रहिवासी असल्याचे समजते. घटनेच्या वेळी त्याने पारंपारिक काश्मिरी पोषाख परिधान केला होता. या घटनेची माहिती मिळताच गुप्तचर विभागाचे अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि जिल्हा प्रशासकीय अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. हा इसम कडक सुरक्षा व्यवस्था भेदून आत कसा शिरला, यादृष्टीने तैनात सुरक्षा पथकाचीही चौकशी केली जात आहे. या प्रकरणातील सूत्रधाराला ताब्यात घेतल्यानंतर, जवळच काश्मिरी कपडे विकणाऱ्या इतर दोन तरुणांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पाठलाग करून त्यांनाही ताब्यात घेतले असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.

-------------

### परभणीत कीर्तनाहून येताना

परभणीतील पिंपळामधील कीर्तनसाठी गेले होते. गावातील कीर्तन आटोपल्यानंतर आपल्या घराकडे निघाले होते. ते लोअर दुधना डाव्या कालव्याच्या जवळ येताच महाराजांच्या दुचाकीला कारने जोरात धडक दिली. यामध्ये तिघेही गंभीर जखमी झाले. त्यांनरा तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल केले. पण उपचारावेळी तिघांचा मृत्यू झाला. अपघातात वारकऱ्यांचे निधन झाल्याची माहिती कळताच बोर्डी गावावर शोककळा पसरली. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

--------------

### जागतिक शेतकरी

५०० हून अधिक संशोधक, धोरणकर्ते, कृषी क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय तज्ज्ञ, सीजीआयएआर केंद्रांचे प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, शेतकरी संघटना, महिला शेतकरी, कृषी उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, स्टार्ट-अप्स, उद्योजक, कृषी-तंत्रज्ञान क्षेत्रातील नवोन्मेषक तसेच विद्यार्थी सहभागी होणार आहेत. विविध देशांतील अनुभव, यशोगाथा आणि संशोधन निष्कर्ष या मंचावर मांडले जाणार आहेत.

## थोडक्यात



### जि प प्रा शा साबलखेड या शाळेत विद्यार्थ्यांनी भरवला आनंदी बाजार

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील साबलखेड जि प प्रा शाळेत मुख्याध्यापिका आढाव मॅडम आणि कोळीसर,गव्हाळेसर, गोसावी मॅडम,गुंजाळ मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या विध्यार्थीनी जि प प्रा शाळेच्या प्रांगणात आनंदी बाजार भरवला होता यामध्ये खाण्याचे पदार्थ, वेगवेगळ्या प्रकारच्या पालीभाज्यांचे स्टॉल लावण्यात आले होते.या प्रसंगी सरपंच शिवाजी बुरंगुले,शाळा व्यवस्थापन अध्यक्ष अमोल देसाई,ग्रामसेवक मॅडम,पालकवर्ग,यांनी आनंदी बाजारामध्ये गर्दी करुन खरेदी करुन विध्यार्थींच्या सुप्त गुणांना वाव मिळते तसेच प्रत्यक्ष व्यवहार कसा केला जातो हे अनुभव पहावयास मिळाले.

### ॲड. विवेकानंद सानप यांना मातृशोक

बीड । प्रतिनिधी



मराठवाड्यातील प्रसिद्ध विधीज्ञ तथा जाणीव प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. विवेकानंद शंकरराव सानप यांच्या मातोश्री श्रीमती कृष्णाबाई शंकरराव सानप यांचे दिनांक १० जानेवारी रोजी शनिवारी पहाटे त्यांच्या बीड शहरातील चाणक्य पुरी येथील निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झाले मृत्यू समय त्यांचे वय ९३ वर्ष होते.

बीड शहरातील नामांकित विधीज्ञ तथा सामाजिक कार्यकर्ते ॲड. विवेकानंद सानप यांच्या मातोश्री कृष्णाबाई सानप यांचे वृद्धापकाळाने दिनांक १० जानेवारी रोजी पहाटे निधन झाले. त्यांच्यावर बीड शहरातील संत भगवान बाबा स्मशानभूमी बार्शी रोड बीड येथे दुपारी एकच्या सुमारास अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. या अंत्यसंस्काराच्या वेळी बीड शहरातील नामांकित विधीज्ञ, राजकीय कार्यकर्ते ,सामाजिक कार्यकर्ते ,डॉक्टर ,प्राध्यापक, नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### दिव्यांग क्रीडा स्पर्धेत नेकनूर येथील मूकबधिर शाळेचे घवघवीत यश

बीड : मा. जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी बीड यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या २०२६ मधील दिव्यांग क्रीडा स्पर्धा दिनांक ७,८,९ जानेवारी या तीन दिवसाच्या स्पर्धा अंबाजोगाई येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. बीड जिल्हातील४८ दिव्यांग शाळेमधील ३५० दिव्यांग विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. त्यामध्ये नेकनूर येथील मूकबधिर शाळेतील सात विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यामध्ये प्रथम क्रमांकाचे चार पारितोषिके या विद्यार्थ्यांनी जिंकून दिमाखात राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये आपले स्थान पक्के केले आहे.

१.)जगताप दिपाली-२००मी धावणे-प्रथम क्रमांक. २.)चौरे गीता -१००मी धावणे- प्रथम क्रमांक.. ३)चौरे गीता -लांब उडी- प्रथम क्रमांक ४)हजारे सुदर्शन-१००मी धावणे- तृतीय क्रमांक. ५)पवार समर्थ १००मी धावणे- तृतीय क्रमांक. ६)पवार समर्थ- लांब उडी- द्वितीय क्रमांक. या विद्यार्थ्यांनी पारितोषिक मिळून नेकनूर येथील मूकबधिर शाळेचे नाव उज्वल केले आहे. या दिव्यांग क्रीडा स्पर्धा तीन दिवस सुरू होत्या यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिकेट, संगीत खुर्ची इत्यादी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या तीन दिवसीय दिव्यांग क्रीडा स्पर्धांचा दिव्यांग विद्यार्थ्यांनी भरभरून आनंद घेतला व यश संपादन केले. या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेकरिता संस्थेचे अध्यक्ष श्री खारके साहेब, मूकबधिर शाळेतील मुख्याध्यापक श्री लुचारे सर, क्रीडा शिक्षक श्री कुलकर्णी सर, गिराम सर, खरंगुळे मॅडम, लंबाटे सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या विद्यार्थ्यांच्या कौतुकास्पद कामगिरी करिता मूकबधिर शाळेतील सर्व कर्मचारी तसेच नेकनूर परिसरात सर्वत्र यांचे कौतुक होत आहे.

# आष्टी शहरासाठी १० एमव्हीए क्षमतेचा नवा ट्रान्सफॉर्मर दाखल

## आ.सुरेश धस यांच्या हस्ते विधीवत पूजन; कामास औपचारिक सुरुवात

आष्टी । प्रतिनिधी

यापूर्वी छोटा ट्रान्सफॉर्मर मिळविण्यासाठीही मोठा संघर्ष करावा लागत होता. मात्र आता राज्याचे ऊर्जा खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असल्यामुळे आपल्या मतदारसंघात ट्रान्सफॉर्मर सहज आणि वेगाने मंजूर होऊन उपलब्ध होत आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महावितरणमध्ये प्रभावी योजना राबविल्या जात असून येत्या काळात शेतकऱ्यांसाठी वीजपुरवठ्याच्या बाबतीत चांगले दिवस येणार असल्याचा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला.

याआधी १३ आणि आता ११ असे एकूण २३ ट्रान्सफॉर्मर मंजूर झाल्याने मतदारसंघातील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. मुख्यमंत्री सौर कृषी वीज वाहिनी २.० या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यांतील कृषी वीजपुरवठा अधिक सक्षम व सुरळीत करण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. आष्टी, पाटोदा, शिरूर आणि कासार तालुक्यांतील एकूण ११ वीज उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी १० व ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज शनिवार (दि. १०) रोजी १० एम.व्ही.ए. क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर आष्टी शहरासाठी दाखल झाला. या ट्रान्सफॉर्मरचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले.



या नव्या ट्रान्सफॉर्मरमुळे कृषी पंपांना स्थिर वीजपुरवठा लोडशेडिंग व भार नियंत्रणात सुधारणा कमी व्होल्टेजची समस्या दूर

शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत दर्जेदार वीज

या सर्व बाबींना मोठा फायदा होणार असून परिणामी शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही सकारात्मक बदल घडून येणार आहे.

१० एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर :

३३/११ के.व्ही. उपकेंद्र, आष्टी, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, धानोरा, ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर :, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, सावरगाव

३३/११ के.व्ही. उपकेंद्र, जळगाव (कडा कारखाना), ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, डोईठाण, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कुसळं, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, लांबरवाडी

३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कोतन, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, दासखेड ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, घाटशीळ-पारगाव, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, भायाळ

या ठिकाणी नव्या क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार असून त्यापैकी आज आष्टी शहरात ट्रान्सफॉर्मर प्रत्यक्ष दाखल झाल्याने नागरिक व शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्रबुद्धे, भाऊसाहेब भवर, महावितरणचे उपअभियंता शिवाजी देशमुख, महेश हंबर्डे, भाऊसाहेब निंबाळकर, सुनील मेहेर, बाळू शेठ मेहेर, भारत मुरकुटे, सुरेश वारंगुळे, विठ्ठल शेंबडे, राजू निकाळजे, बाळासाहेब घोडके, शमशोद्दीन शेख, श्रेयस मेहेर, इरशान खान, अविनाश गिरी, राजेंद्र जोशी, अनंतदेवा जोशी, सुनील रेडेकर, राहुल मुथ्था, मनोज धनवडे, कपिल अग्रवाल, नितीन खिळे, गणेश पोकळे, अजित मुळे, सागर धोंडे, बबलू शेख, सतीश टकले यांच्यासह व्यापारी,पत्रकार,नागरिक,अनेक मान्यवर उपस्थित होते.

# कै.राजाभाऊ चौसाळकर यांचे कार्य प्रेरणादायी-डॉ.शरद हेबाळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सामाजिक कार्य करत असताना कै. राजाभाऊ चौसाळकर यांनी कितीतरी संकटं अडचणी आल्या तरीही त्यांनी संघर्ष केला.संघाच्या जडणघडणीत कै.राजाभाऊ चौसाळकर यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असून वारसा शिक्षकांनी जोपासला पाहिजे असे आवाहन इतिहासाचे अभ्यासक डॉ.शरद हेबाळकर यांनी केले.

येथील खोलेश्वर महाविद्यालयात भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक सदस्य कै. राजाभाऊ (दादा) तथा बाळकृष्ण शिवाजीराव चौसाळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित आजी-माजी शिक्षक मेळाव्याप्रसंगी बोलत होते. यावेळी मंचावर भारतीय शिक्षण प्रसारक



संस्थेचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलुरकर, ज्येष्ठ स्वयंसेवक तथा भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थापक सदस्य तुळशीराम धायगुडे,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह बीपीन क्षीरसागर, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर, स्थानिक व्यवस्था मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर आदी मंचावर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.हेबाळकर म्हणाले की, भाग्यवान असलेले कार्यकर्ते तुळशीराम धायगुडे कै.राजाभाऊ चौसाळकर, कै. श्रीधर खारकर गुरुजी,वैद्य, के.टी.कोदरकर यांनी ७५ वर्षांपूर्वी भा.शि.प्र शिक्षण संस्था उभारून राष्ट्रभक्त व सुसंस्कारित पिढ्या घडवण्याचे काम केले.बिपिन क्षीरसागर म्हणाले की, भा.शि.प्र. संस्थेला वैचारिक दिशा देणारे राजाभाऊ चौसाळकर यांनी संघाच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार करण्याचे काम केल्याचे सांगितले.अध्यक्षीय समारोपात डॉ. आलुरकर म्हणाले कै. राजाभाऊ चौसाळकर यांनी केलेले कार्य महान असून ते संघकार्याचे व्रत म्हणून त्यांनी केले. शिक्षकांनी संघ स्वयंसेवकांची आदर्श प्रणाली घेऊन वाटचाल केली पाहिजे. नवनिर्वाचित नगरसेविका सौ.सुचिता देशपांडे ह्या विजयी झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच ऑस्ट्रेलिया येथे मराठी शाळा स्थापन केलेल्या डॉ.कपिल चौसाळकर आदींचा गौरव करण्यात आला.या कार्यक्रमासाठी केंद्रीय कार्यकारिणी सदस्या कल्पना चौसाळकर,वर्षा मुंडे, विष्णु सोनवणे,उन्मेष मातेकर,अविनाश मुडेगावकर, निवृत्त कर्मचारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### परळी पालिकेत राष्ट्रवादीने

महायुतीच्या माध्यमातून विजय मिळाला. या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे १६, भाजपचे ७ तर शिवसेनेचे २ नगरसेवक निवडून आले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचा संयुक्त गट स्थापन करण्यात आला. मात्र गटनेता निवडीसाठी नगरसेवकांच्या नावांसमोर पक्षनिहाय उल्लेख न केलेले पत्र जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात आले. याची शिवसेनेला याबाबत माहिती मिळाली नाही. तसेच एमआयएमला गटात समाविष्ट करण्याबाबतही शिवसेनेला पूर्व कल्पना दिली नसल्याचे मुळूक यांनी सांगितले. त्यामुळे या प्रक्रियेशी शिवसेनेचा कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने राजकीय स्पष्टता दाखवून एमआयएमला गटातून वगळावे. अन्यथा शिवसेनेला गटातून बाहेर पडण्याची परवानगी द्यावी; आम्ही बाहेरून पाठिंबा देऊ, असेही मुळूक म्हणाले.

### गणेश डोंगरे यांच्या कुटुंबाला

संपादक ॲड.ज्ञानेश्वर लंगे यांच्यासह शेकडो आंदोलक या लढ्यात सहभागी झाले होते. कडाक्याच्या थंडीतही आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम होते.

प्रशासनाची माघार आणि मदत

आंदोलनाचा वाढता जोर आणि जनभावना लक्षात घेता, कारखाना प्रशासनाला अखेर चर्चेचे पाऊल उचलावे लागले. दीर्घकाळ चाललेल्या चर्चेनंतर आणि आंदोलकांच्या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासनाने २१ लाख रुपये देण्याचे मान्य केले. आज पहाटेच्या सुमारास हा धनादेश अधिकृतपणे डोंगरे यांच्या शोकाकुल कुटुंबीयांकडे सोपवण्यात आला. ‘‘हा विजय केवळ पैशांचा नसून, एका कष्टकरी मजुराच्या हक्काचा आणि संघटित शक्तीचा आहे. गणेश डोंगरे यांच्या कुटुंबाला या मदतीमुळे थोडा आधार मिळेल, पण कष्टकऱ्यांच्या जीवाचे मोल प्रशासनाने वेळीच ओळखायला हवे.‘‘

यावेळी गणेश डोंगरे यांचे कुटुंबीय आणि मोठ्या संख्येने त्यांचे चाहते व ऊसतोड मजूर उपस्थित होते. सोशल मीडियावरही या निर्णयाचे स्वागत होत असून, ‘‘लढा दिला तरच न्याय मिळतो‘‘ अशा भावना व्यक्त केल्या जात आहेत.

### प्रलंबित फेरफार, कार्यालयात

निकाली काढावेत,ई-सेवा मित्र ॲपद्वारे दर आठवड्याला किमान १० प्रमाणपत्रांचे वितरण बंधनकारक,शेती रस्ते व पाणंद रस्त्यांचे प्रस्ताव शासन नियमाप्रमाणेच,१५ दफनभूमीचे प्रस्ताव तात्काळ सादर करावेत, घरकुल योजनेसाठी तालुक्यातील १४ वाळूघाट निश्चित करण्यात आले असून लाभार्थ्यांना नियमानुसार वाळू मिळणार,अशी माहितीही त्यांनी दिली.कामात हलगर्जीपणा करणाऱ्यांवर थेट कारवाई केली जाईल,असा स्पष्ट इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.यावेळी उपविभागीय अधिकारी वसिमा शेख,तहसिलदार वैशाली पाटील,नायब तहसिलदार आशा पडोळे,नायब तहसिलदार पांडुरंग माढेकर,भगिरथ धारक यांच्यासह तहसिल अधिकारी,मंडळ अधिकारी,तलाठी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आनंदऋषीजी नेत्रालय

विश्वास आनंदऋषीजी नेत्रालया ला मिळत असल्याचे दिसून येत आहे. दिनांक ९ जानेवारी रोजी माजलगाव येथील आनंदऋषीजी नेत्रालय व व्हिजन सेंटर पाच वर्ष पूर्ण झाले असून सहाव्या वर्षात पदार्पण करत आहे. दृष्टी तज्ञ गणेश मस्के सर माजलगाव येथील व्हिजन सेंटर उपलब्ध असुन ते संगणकाद्वारे नेत्र तपासणी, मोतीबिंदू चिकित्सा तपासणी, स्लिट लॅम्प चिकित्सा, रेटिना नेत्रपटल तपासणी, दृष्टी चिकित्सा व नंबर काढणे, ग्लुकोमा काचबिंदू चिकित्सा आदी तपासणी करून जे काही निदर्शनास येईल रुग्णांना शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असते अश्या रुग्णांना अल्पदरात माजलगाव येथून मंगळवारी आणि शुक्रवारी अहमदनगर येथे संस्थेच्या बस मधुन घेऊन गेले जाते तिथे राहण्याची खाण्याची सुंदर अशी व्यवस्था असते शस्त्रक्रिया झाल्यानंतर संस्थेची बस माजलगाव येथे रुग्णांना सोडण्यासाठी परत येते. आनंदऋषीजी नेत्रालय व्हिजन सेंटर व दृष्टी आय केअर ऑप्टिकल्स आज पाच वर्ष पूर्ण होत आहेत या पाच वर्षांमध्ये ५५२३४ गरजु रुग्णांची तपासणी केली व ७०१३ रुग्णांनाच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. आपण दिलेल्या सेवेच्या संधी बद्दल अनमोल प्रतिसादाबद्दल आपले आभार मानले.

- गणेश मस्के ( दृष्टी तज्ञ अहमदनगर, माजलगाव )

### रेन्यू पॉवर कंपनीची

संमती घेणे गरजेचे असताना ती घेतली गेली नाही सामूहिक शेती असेल तर सर्वांची संमती घेणे गरजेचे असताना ती घेतली गेली नाही विशेष म्हणजे यापूर्वीच गाव तलावासाठी आमची जमीन शासनाने संपादित केली आहे आणि आमच्या कुटुंबाची उपजीविका आता त्याच वहिती जमिनीवर असल्याने त्याच वहिती जमिनीवर मनमानी पद्धतीने रेन्यू पॉवर कंपनीने व त्यांच्या गुत्तेदाराने विद्युत पूल उभे केल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे भविष्यातही ही जमीन नापीक होऊ शकते तेव्हा माझ्या जमिनीमध्ये उभे केलेले रेन्यू कंपनीने विद्युत पोल त्वरित काढण्यात यावेत अशी मागणी जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात केली आहे संबंधित कंपनीला निवेदन देण्यासाठी गेली चार दिवस चकरा मारल्या मात्र तेथे कोणीही अधिकारी आढळून आला नाही म्हणून जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

# माणुसकीचे दर्शन: ‘इंटिग्रेटिव्ह सिस्टम्स’च्या टीम उबिकाकडून बीड जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदतीचा हात

पाटोदा । प्रतिनिधी

संकटकाळात एकमेकांना साथ देणे हीच खरी माणुसकी, याचा प्रत्यय नुकताच बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील तांबाराजुरी येथे आला. महाराष्ट्रात ओढवलेल्या नैसर्गिक आपत्तीनंतर, पुणे येथील इंटिग्रेटिव्ह सिस्टम्स प्रा. लि. (खपींशसीरींळींश ड्वीींशाी झीीं श्रीव) या कंपनीच्या ’टीम उबिका’ (ढशरा णलळज्ञर) ने सामाजिक बांधिलकी जपत पूरग्रस्त आणि गरजू कुटुंबांना मदतीचा हात दिला आहे.

कंपनीचे मालक राजेश सर यांच्या मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. विशेष म्हणजे, याच कंपनीत मागील तीन वर्षांपासून कार्यरत असलेले कर्मचारी कु. तुकाराम धर्मराज तांबे यांच्या पुढाकाराने ही मदत थेट गरजूपर्यंत पोहोचवण्यात आली. तुकाराम तांबे हे स्वतः एका सामान्य कुटुंबातील असूनही त्यांनी आपल्या गावातील लोकांसाठी कंपनीकडे मदतीचे आवाहन केले होते. त्यांच्या या



आवाहनाला प्रतिसाद देत ’टीम उबिका’च्या सदस्यांनी एकूण २६,५५० रुपयांचा मदतनिधी जमा केला.

जीवनावश्यक वस्तूंचे वाटप:

या जमा झालेल्या निधीतून तांबाराजुरी गावातील गरजू कुटुंबांना मूलभूत गरजांच्या वस्तूंचे वाटप करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने:

घरासाठी लागणारा संपूर्ण किराणा, मुला-मुलींसाठी नवीन कपडे, चप्पल आणि बूट, थंडीपासून संरक्षणासाठी स्वेटर, रग आणि ब्लँकेट, महिलांसाठी साड्या आणि वृद्धांसाठी उबदार कपडे

गावकऱ्यांकडून कौतुक:

स्वतःची आर्थिक परिस्थिती बेताची असतानाही आपल्या गावातील गोरगरीब जनतेच्या दुःखात सहभागी होऊन तुकाराम तांबे यांनी दिलेले हे योगदान ’फूल ना फुलाची पाकळी’ ठरले आहे. या मदतीमुळे अनेक कुटुंबांना मोठा आधार मिळाला आहे. या कार्याबद्दल तांबाराजुरी ग्रामस्थांनी तुकाराम तांबे, राजेश सर आणि संपूर्ण ’टीम उबिका’चे मनःपूर्वक आभार मानले आहेत. संकटाच्या काळात एका कंपनीने आणि त्यांच्या कर्मचाऱ्याने दाखवलेली ही तत्परता समाजासमोर एक आदर्श निर्माण करणारी ठरली आहे.

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीने वाचन चळवळीला नवीन दिशा मिळाली-प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे

किल्ले-धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवाडा निमित्ताने माहिती व ज्ञान स्रोत केंद्राच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन व डिजिटल रिपॉझिटरी प्रदर्शन सोहळ्यास विद्यार्थी, शिक्षक व वाचक वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने माहितीच्या साधनांचा वापर कसा करता येतो याची वाचकांना या उपक्रमातून माहिती मिळाली. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सचिदानंद ढेपे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या प्रदर्शनात विविध विषयांवरील शैक्षणिक, वैचारिक, वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा करिता उपयुक्त ग्रंथ तसेच संशोधनासाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असलेल्या ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले. नव्याने विकसित झालेल्या डिजिटल रिपॉझिटरीच्या माध्यमातून क्यूआर कोडच्या माध्यमातून ई-बुक्स, ई-जर्नल्स, ऑनलाईन डेटाबेस, शैक्षणिक व्हिडिओ, शासनाच्या शैक्षणिक संकेतस्थळांची माहिती वाचकांना प्रत्यक्ष पाहता व अनुभवता आली. यामुळे वाचकांमध्ये डिजिटल साधनांविषयी मोठी उत्सुकता आणि जागरूकता निर्माण झाली. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, आजच्या डिजिटल युगात ग्रंथालये केवळ पुस्तके देणारी ठिकाणे न राहता ज्ञानाची स्मार्ट केंद्रे होत आहेत. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा माहिती शोधण्याचा दृष्टिकोन व्यापक होतो. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथपाल डॉ. गोपाळ सगर व ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रदर्शनातील नियोजनबद्धतेमुळे वाचकांना आधुनिक ग्रंथालयातील सेवांची सविस्तर माहिती घेता आली. एकूणच शिस्तबद्ध, अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात प्रदर्शन यशस्वी झाले. यामुळे वाचनसंस्कृतील नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा व कला स्पर्धेत छत्रपती शाहू महाराज अपंग विद्यालयाचे घवघवीत यश

आष्टी प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा व कला स्पर्धेमध्ये आष्टी येथील छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालयातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धेत प्रथम क्रमांकाची सात दृतिय क्रमांकाची सात व तृतीय क्रमांकाचे एक असे एकूण १५ व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळून घवघवीत यश संपादन केले आहे. या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रियाराणी पाटील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता नखाते साहेब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे सचिव भास्कर भवर मुख्याध्यापक विजय झांजे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय बीड व कै.सुमतीताई गुणाले मतिमंद विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अंबाजोगाई येथे बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळेतील मुला



मुलींच्या वेगवेगळ्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धाचे आयोजन अंबाजोगाई येथे ०७ जानेवारी ते ०९ जानेवारी दरम्यान करण्यात आले होते या स्पर्धेचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते करण्यात आले तर या कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान, शिक्षण अधिकारी तथा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रियाराणी पाटील वैसाका नखाते यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाले तर कार्यक्रमाचे बक्षीस वितरण वितरण जिल्हा सक्षमीकरण अधिकारी प्रियाराणी पाटील व वैसाखा नकाते यांच्या हस्ते करण्यात आले या स्पर्धेमध्ये छत्रपती शाहू महाराज निवासी अपंग विद्यालयातील विद्यार्थ्यांनी माऊली माऊली हे गीत सादर करत द्वितीय क्रमांक पटकावला तर विविध स्पर्धेमध्ये सहभाग घेत प्रथम ,द्वितीय व तृतीय क्रमांकाचे एकूण १५ बक्षीस मिळवत या स्पर्धेत घवघवीचे यश संपादन केले आहे या जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये पुढील विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन बक्षीस मिळवले आहेत यामध्ये

रामेश्वर काटे सॉफ्टबॉल थ्रो प्रथम व १००

मीटर धावणे प्रथम क गट ,हरीओम गोरे ५० मीटर धावणे प्रथम १०० मीटर धावणे प्रथम ब गट,सुनील डोलारे १०० मीटर धावणे प्रथम व्हील चेअर वर बसून गोळा फेक प्रथम क गट, पवन कांबळे व्हीलचेआर रेस क गट प्रथम ,अजय सकट १०० मीटर धावणे अ गट प्रथम, आकाश दिवटे ५० मीटर धावणे द्वितीय क्रमांक ब गट कार्तिक निमसे ५० मीटर धावणे क गट दुतीय क्रमांक मयुरी पन्हाळकर द्वितीय क्रमांक पूजा मोरे प्रथम क्रमांक पूजा गरगटे द्वितीय क्रमांक क गट शुभम तोर व सार्थक सातपुते यांनीही सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग घेतला या विजेत्या विद्यार्थ्यांचे जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी प्रियाराणी पाटील वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता नखाते साहेब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेवरावजी पोकळे सचिव भास्कर भवर यांनी अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी मुख्याध्यापक विजय झांजे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे क्रीडा शिक्षक बाळासाहेब घोडके ,शरद तळेकर ,भाऊसाहेब ननवरे, शिवाजी नलावडे ,सुधीर शिंदे ,मनोहर कवडे, पुष्पा राऊत,रजिया बेग यांनी परिश्रम घेतले . या सर्वांचे अभिनंदन करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# संविधानाला जीवनपद्धती म्हणून युवकांनी अंगीकार करावा -डॉ.उमाकांत वानखेडे

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील कला व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष हिवाळी शिबिर मौजे बांगरवाडी तालुका पाटोदा जिल्हा बीड येथे चालू आहे या कार्यक्रमाच्या दुसऱ्या बौद्धिक क्षेत्रात भारतीय संविधान आणि लोकशाही या विषयावर प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ उमाकांत राठोड यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्राध्यापक प्रदीप मांजरे चा कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राध्यापक गोपाळ दांडिया उपस्थित होते प्राध्यापक वानखेडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना भारतीय संविधान जगातील सर्वात मोठी संविधान असून या संविधानाचा आपण जीवनपद्धती म्हणून त्याचा अंगीकार करावा असे आव्हान त्यांनी केले या कार्यक्रमात प्राध्यापक प्रदीप मांजरे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राध्यापक गोपाल धाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले व संविधानाचा सर्वांनी अंगीकार करावा व भारताचे भविष्य उज्वल करावेअशी आव्हान केली या कार्यक्रमाची सूत्रसंचालन प्राध्यापक डॉ नारायण फुने यांनी केले तर आभार प्राध्यापक डॉ कल्पना घाडगे यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक पापाजी चव्हाण प्राध्यापक बापू घोक्षे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ लोखंडे गावातील नागरिक ईश्वर काळे शाळेचे सहशिक्षक सोनवणे सर राख सर स्वयंसेवक यांनी परिश्रम घेतले.




# हरभरा दर घसरले ; हमीभाव देवूनही शेतकऱ्यांना फायदा नाही

**पुणे । प्रतिनिधी**

**यंदा उत्पादन चांगले होण्याची शक्यता असतानाच हरभऱ्याचे दर अचानक घसरले आहेत. खासगी बाजारात हरभरा पाच हजारांवर आल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले असून हमीभाव फक्त कागदावरच राहतोय का, असा सवाल उपस्थित होत आहे. रब्बी हंगाम सुरू होण्याआधीच हरभऱ्याच्या दरांनी शेतकऱ्यांना धक्का दिला आहे. जमिनीत मुबलक आर्द्रता आणि अनुकूल वातावरणामुळे यंदा हरभऱ्याच्या पेरणीत लक्षणीय वाढ झाली असताना, दुसरीकडे खासगी बाजारात हरभऱ्याचे दर थेट पाच हजार रुपयांवर घसरल्याने शेतकरी चिंतेत सापडले आहेत.**



सध्या बाजार समित्यांमध्ये हमीभावाच्या तुलनेत ५०० ते ७०० रुपयांनी कमी दर मिळत असून व्यापाऱ्यांनी संगनमताने दर पाडल्याचा आरोप शेतकरी करत आहेत. यंदाच्या रब्बी हंगामात हरभऱ्याचे सरासरीपेक्षा अधिक क्षेत्र झाले आहे. पहिल्या टप्प्यात पेरलेला हरभरा सध्या बहरावर असून काही ठिकाणी घाटे पक्व होण्याच्या अवस्थेत आहेत. पावसाळ्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने जमिनीत निर्माण झालेली आर्द्रता जिरायती हरभऱ्यासाठी अत्यंत पोषक ठरली आहे. त्यातच वातावरण उबदार राहिल्यामुळे हरभऱ्याची वाढ जोमात असून यंदा चांगल्या उत्पादनाची अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. मात्र, हंगाम सुरू होण्यापूर्वीच दर घसरल्याने या अपेक्षांवर पाणी फेरले जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सध्या हरभऱ्याची आवक कमी असून प्रतवारीही फारशी चांगली नसल्याने दरात सातत्याने चढ-उतार होत आहेत. मात्र, हंगाम जसजसा पुढे जाईल तसतशी आवक वाढण्याची शक्यता असल्याने दर आणखी दबावात येण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. गतवर्षी हंगामात हरभऱ्याला ६ हजार रुपये प्रति क्विंटलपर्यंत दर मिळाला होता. यंदा मात्र आयात धोरण, बाजारातील मागणी आणि व्यापाऱ्यांच्या भूमिकेमुळे दराबाबत अनिश्चितता कायम आहे. हरभऱ्याच्या दरातील घसरण रोखण्यासाठी शासनाने तातडीने हमीभावाने खरेदी सुरू करावी, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. अन्यथा उत्पादन खर्चही न निघाल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.


### हमीभाव जाहीर; प्रत्यक्षात कमीच दर

केंद्र शासनाने यंदा हरभऱ्यासाठी हमीभावात २१० रुपयांची वाढ करत ५ हजार ६५० रुपये प्रति क्विंटल असा दर जाहीर केला आहे. मात्र प्रत्यक्षात बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांना ४ हजार ६५० ते ५ हजार १५० रुपये प्रति क्विंटल इतकाच दर मिळत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे हमीभाव जाहीर करूनही त्याचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसल्याची नाराजी व्यक्त होत आहे.

### आयातमुक्त धोरणाचा फटका

केंद्र शासनाच्या ड्यूटी फ्री आयातमुक्त धोरणामुळे (२०२४२५) देशात पिली मटर आणि मसूर डाळीची मोठ्या प्रमाणात आयात झाली आहे. या डाळी हरभऱ्याच्या डाळीचा पर्याय म्हणून वापरल्या जात असल्याने देशांतर्गत हरभऱ्याच्या मागणीत घट झाली आहे. परिणामी हरभऱ्याच्या दरांवर दबाव निर्माण झाला असून भाव घसरल्याचे जाणकारांचे मत आहे. कॅनडा, रशिया आणि ऑस्ट्रेलियामधून हरभऱ्याची मोठ्या प्रमाणावर आयात होते. यंदा आयातीवर १० टक्के शुल्क लावण्यात आले असले तरी त्याचा अपेक्षित परिणाम अद्याप बाजारात दिसून येत नसल्याचे व्यापारी वर्गाकडून सांगण्यात येत आहे.

## जाणून घ्या उन्हाळी मुगाच्या प्रमुख जाती



**उन्हाळी हंगामात कमी खर्चात, कमी पाण्यात आणि कमी कालावधीमध्ये उत्पादन देणारे पीक म्हणून उन्हाळी मूग शेतकऱ्यांसाठी आर्थिक आधार ठरते. मात्र चांगले आणि स्थिर उत्पादन मिळवायचे असेल, तर योग्य वाणाची निवड करणे अत्यंत महत्त्वाचे असते. महाराष्ट्रातील विविध कृषी विद्यापीठे व संशोधन संस्थांनी विकसित केलेले उन्हाळी मुगाचे वाण शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरत आहेत.**

**वैभव :** वैभव हा उन्हाळी मुगाचा सुधारित वाण आहे. याचे दाणे मध्यम टपोरे व हिरवट-तपकिरी रंगाचे असतात. हा वाण सुमारे ७० ते ७५ दिवसात काढणीला तयार होतो. या वाणाची सरासरी उत्पादनक्षमता १४ ते १६ क्विंटल प्रति हेक्टर इतकी आहे. हा वाण भुरी रोगासाठी प्रतिकारक आहे.

**बी.पी.एम.आर.-१४५ :** हा वाण ६५ ते ७० दिवसांत तयार होणारा लवकर येणारा उन्हाळी मुगाचा वाण आहे. याची उत्पादनक्षमता १२ ते १४ क्विंटल प्रति हेक्टर इतकी असून दाणे टपोरे, हिरवे आणि शेंगा लांब असतात. भुरी रोगासाठी हा वाण प्रतिकारक असल्यामुळे उन्हाळी हंगामात सुरक्षित उत्पादन मिळते.

**बी.एम. २००२-१ :** बी.एम. २००२-१ हा लवकर पक्व होणारा उन्हाळी मुगाचा वाण असून ६५ ते ७० दिवसात तयार होतो. या वाणाची उत्पादनक्षमता १२ ते १४ क्विंटल प्रति हेक्टर इतकी आहे. सरळ व निश्चित वाढ, एकाच वेळी पक्वता, पिवळी फुले आणि मोठे टपोरे हिरवे दाणे ही याची वैशिष्ट्ये आहेत. भुरी रोगास मध्यम प्रतिकारक असून अधिक उत्पादन देणारा वाण आहे.

**पी.के.व्ही. ग्रीन गोल्ड :** हा वाण ११० ते ११५ दिवसात काढणीला येतो. या वाणाची उत्पादनक्षमता १० ते १४ क्विंटल प्रति हेक्टर इतकी असून दाणे मध्यम आकाराचे असतात. एकाच वेळी पक्वता येत असल्यामुळे काढणी सोपी होते. तसेच हा वाण भुरी रोगासाठी प्रतिकारक असल्यामुळे उन्हाळी हंगामात हा वाण उपयुक्त ठरतो.

**पीकेव्ही-एकेएम-४ :** पीकेव्ही-एकेएम-४ हा ६५ ते ७० दिवसांत तयार होणारा उन्हाळी मुगाचा वाण आहे. या वाणाची उत्पादनक्षमता १२ ते १४ क्विंटल प्रति हेक्टर आहे. दाणे मध्यम आकाराचे व हिरव्या रंगाचे असून एकाच वेळी पक्वता येते. रोगप्रतिकारक क्षमता चांगली असल्यामुळे हा वाण शेतकऱ्यांसाठी फायदेशीर ठरतो.

**बी.एम. २००३-२ :** हा वाण ६५ ते ७० दिवसांत काढणीला येणारा असून उत्पादनक्षमता १२ ते १४ क्विंटल प्रति हेक्टर आहे. बुटकी व उभी सरळ वाढ, पिवळी फुले, लांब शेंगा आणि चमकदार हिरवे टपोरे दाणे ही याची वैशिष्ट्ये आहेत. हा वाण करपा व भुरी रोगासाठी प्रतिकारक असल्यामुळे उन्हाळी मुगासाठी हा वाण योग्य आहे.

**उत्कर्ष :** उत्कर्ष हा लवकर येणारा उन्हाळी मुगाचा वाण असून ६५ ते ७० दिवसात काढणीस तयार होतो. उत्पादनक्षमता १२ ते १४ क्विंटल प्रति हेक्टर आहे. शेंगा १३ ते १५ सें.मी. लांब असून प्रति शेंग १३ ते १४ दाणे मिळतात. दाणे चमकदार हिरवे व टपोरे असून भुरी रोगासाठी प्रतिकारक आहे. अधिक उत्पादन देणारा वाण म्हणून ओळखला जातो.

**आय.पी.एम.-४४-३ (शिखा) :** केवळ ६० ते ७० दिवसात तयार होणारा लवकर येणारा उन्हाळी मुगाचा वाण आहे. या वाणाची उत्पादनक्षमता ११ ते १३ क्विंटल प्रति हेक्टर आहे. उभी सरळ वाढ, मध्यम टपोरे चमकदार हिरवे दाणे आणि पिवळी फुले ही याची वैशिष्ट्ये आहेत. हा वाण पिवळ्या मोझॅक रोगासाठी प्रतिकारक असून उन्हाळी तसेच खरीप हंगामासाठीही उपयुक्त आहे.

**फुले चेतक :** फुले चेतक हा उन्हाळी मुगाचा सुधारित वाण असून हा वाण महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांनी २०२० साली विकसित केला आहे. साधारण ६५ ते ७० दिवसांमध्ये हा वाण काढणीला येतो. या वाणाची उत्पादनक्षमता हेक्टरी १० ते १२ क्विंटल इतकी आहे. हा वाण भुरी व पिवळा मोझॅक रोगासाठी मध्यम प्रतिकारक असून शेंगा पोखरणाऱ्या अळीसाठीसुद्धा प्रतिकारक आहे.

## दूध उत्पादन वाढीसाठी असा द्या दर्जेदार पशुआहार




**जनावरांना दिला जाणारा आहार दुधाच्या गुणवत्तेवर परिणाम करत असतो. जनावरांच्या गरजेनुसार आहाराचे योग्य नियोजन केल्यास दुधाची प्रत सुधारण्यास मदत होते. जनावरांच्या आहारातील चारा आणि पशुखाद्यच्या प्रमाणावर दुधाची प्रत अवलंबून असते. चारा कुट्टीचा योग्य आकार महत्त्वाचा आहे. जो दुधाची प्रत ठरण्यास कारणीभूत असतो आहारामध्ये स्टार्सचे प्रमाण हा महत्त्वाचा घटक आहे त्यामुळे दुधाची प्रत ठरवता येते. आहारमधून मधून दिल्या जाणाऱ्या पदार्थावर दुधाची प्रत अवलंबून असते. पशु आहारातील स्निग्धांश आणि प्रथिने यांची मात्रा दुधाची प्रत वाढवण्यास मदत करते.**

चारा आणि पशुखाद्यचे प्रमाण (४० :६०) कमीत कमी असणे हे दुधाचा स्निग्धांश वाढवण्यास गरजेचे असते. हे प्रमाण ठेवल्यामुळे ओटीपोटातील आम्लता कमी होते प्रोपियनिक आम्लं निर्मिती वाढते जे दुधाचा स्निग्धांश वाढवायला मदत करते.

**धान्य युक्त आहार :** योग्य पशुखाद्य घालताना चारा आणि पशुखाद्यचे प्रमाण आणि तंतुमय पदार्थ विरहीत कार्बोदकाचे प्रमाण महत्त्वाचं ठरतं. तंतुमय पदार्थ विरहित कार्बोदके यांचे प्रमाण एकूण शुष्क पदार्थाच्या आहारावर ३६ ते ३८ टक्के असावे. योग्य प्रमाणात तंतुमय पदार्थ विरहित कार्बोदके खाऊ घातल्यास दुधाचा स्निग्धांश आणि प्रथिने वाढण्यास मदत होते. परंतु अति प्रमाणात खाऊ घातल्यास दुधाचा स्निग्धांश एक युनिट कमी होतो परंतु प्रथिने ०.२ ते ०.३ युनिटने वाढतात.

**धान्य प्रक्रिया :** धान्याचे प्रकार आणि त्यावर करावयाची प्रक्रिया याचा महत्त्वाचा परिणाम आहारामधील स्टार्च, पचनीयता, दूध वाढ तसेच दुधाची प्रत वाढवण्यास मदत होते दळलेले, रोल केलेले, गरम केलेले, स्टीम फ्लेवर्ड, वाफवलेले किंवा गोळी पेंड स्वरूपात धान्य खाऊ घातल्यास त्यामधून स्टार्सची पचनियता आणि प्रोपियनिक आमल निर्मिती वाढते. जे दुधाचा स्निग्धांश वाढवायला मदत करतात. स्टीम फ्लेक्स मका किंवा ज्वारी तुलनेनं वाफवलेला मका किंवा ज्वारी पेक्षा सातत्यपूर्ण दूध निर्मिती आणि दुधाचे प्रथिन वाढ होते परंतु दुधाच्या स्निग्धांश यांमध्ये बदल होत नाही. काही धान्य जसे की गहू मध्ये कार्बोदके असतात याचा आणि त्याच्यावरील अति प्रमाणातील प्रक्रिया विस्तृत प्रमाणात वापराचा परिणाम दुधाच्या स्निग्धांश आणि दूध निर्मिती कमी होण्यावर होतो. कार्बोदके आणि प्रथिनांचे माध्यम तसेच तंतुमय पदार्थ कर्बोदकांचे आहारातील प्रमाण यांचे निरीक्षण करावे जेणेकरून योग्य किणवन पद्धतीची खात्री होते. त्यामुळे दुधाची प्रत वाढण्यास मदत होते

**दूध उत्पादन वाढवण्यासाठी :** व्यवस्थित भाकड काळ ठरवावा. वेताच्या पहिल्या आठवड्यात दुधाचा ताप (रक्तातील कॅल्शिअम कमी होणे) येणार नाही याची काळजी घ्यावी. व्यायल्यानंतर गाईची निगा राखावी. ओटीपोटातील आरोग्य आणि आम्लता प्रतिबंधित करावी. चयापचयाचे आजार ओळखून त्यावर तातडीने उपाययोजना करावी. वेताच्या वेळी शरीर स्थिती गुण बीसीएस ३.० ते ३.२५ यादरम्यान ठेवावा.




### जागतिक दिवस
### जागतिक हिंदी दिवस

### महत्वाच्या घटना

१६६६ : सुरत लुटून शिवाजीमहाराज राजगडाकडे निघाले.
१७३० : पहिल्या बाजीरावाच्या कारकिर्दीत शनिवारवाड्याच्या बांधकामास सुरुवात झाली.
१८०६ : केपटाऊन येथे स्थायिक असलेले डच वसाहतवादी ब्रिटिशांना शरण गेले.
१८१० : नेपोलियन बोनापार्टने जोसेफाइन या आपल्या पहिल्या पत्नीला घटस्फोट दिला.
१८३९ : पहिल्यांदा भारताचा चहा इंग्लंड ला पोहचला.
१८६३ : चार्ल्स पिअर्सन याच्या आराखड्यानुसार रचना केलेल्या ७ किमी लांबीच्या व सात स्थानके असलेल्या भुयारी रेल्वेची लंडनमध्ये सुरूवात झाली.
१८७० : जॉन डी. रॉकफेलर याने 'स्टँडर्ड ऑईल' कंपनीची स्थापना केली.
१८७० : बॉम्बे, बडोदा अँड सेंट्रल इंडिया रेल्वे या ब्रिटिशकालीन रेल्वे कंपनीच्या इतिहासाचे साक्षीदार असलेले चर्चगेट रेल्वे स्थानक सुरू झाले. या स्थानकावर फक्त एक फलाट होता.
१८८४ : ब्रिटन च्या रसायन शास्त्रज्ञ जोज़फ एस्पीडियन यांनी पहिल्यांदा सिमेंट बनविले.
१९२० : पहिले महायुद्ध व्हर्सायचा तह अस्तित्त्वात आल्याने पहिले महायुद्ध संपले.
१९२६ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी हुतात्मा स्वामी श्रद्धानंदांच्या स्मरणार्थ 'श्रद्धानंद' साप्ताहिक मुंबईत सुरू केले.
१९२९ : जगात अमाप लोकप्रियता मिळालेले 'द अ‍ॅडव्हेंचर्स ऑफ टिनटिन' हे कॉमिक प्रथमच प्रसिद्ध झाले.
१९६६ : भारत व पाकिस्तान यांच्यात ताश्कंद करार झाला.
१९७२ : पाकिस्तानमधील तुरुंगात ९ महिने काढल्यानंतर शेख मुजीबूर रहमान हे राष्ट्राध्यक्ष म्हणून नुकतेच स्वातंत्र्य मिळालेल्या बांगला देश मधे परतले.
२००६ : माजी प्रधान मंत्री मनमोहन सिंग यांनी १० जानेवारी ला जागतिक हिंदी दिवस म्हणनू साजरे करण्याची घोषणा केली.
२००८ : टाटा कंपनी ने जगातील सर्वात स्वस्त कार नॅनो कार ला बाजारात आणण्यासाठी सुरुवात केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७५ : बाजीराव पेशवे (दुसरे) (मृत्यू: २८ जानेवारी १८५१ ब्रम्हावर्त)
१८९६ : नरहर विष्णू तथा 'काकासाहेब' गाडगीळ स्वातंत्र्यसैनिक, लेखक, वक्ते, राजकीय नेते, केंद्रीय मंत्री आणि पंजाबचे राज्यपाल (मृत्यू: १२ जानेवारी १९६६)
१९०० : मारोतराव सांबशिव कन्नमवार महाराष्ट्राचे दुसरे मुख्यमंत्री (२० नोव्हेंबर १९६२ ते २४ नोव्हेंबर १९६३) (मृत्यू: २४ नोव्हेंबर १९६३)
१९०१ : इतिहास संशोधक डॉ. गणेश हरी खरे यांचा पनवेल येथे जन्म
१९१९ : संस्कुत अभ्यासक आणि रामायणातील शाप आणि वर, महाभारतातील कुमारसंभव या ग्रंथांचे लेखक श्री. र. भिडे यांचा जन्म.
१९२७ : तमिळ अभिनेते शिवाजी गणेशन यांचा जन्म.
१९३७ : भातीय राजनीती तज्ञ मुरली देवड़ा यांचा जन्म.
१९४० : के. जे. येसूदास पार्श्वगायक व संगीतकार
१९४९ : प्रसिद्ध दक्षिणात्य चित्रपट निर्माते अल्लू अरविंद यांचा जन्म.
१९५० : आदिवासींसाठी आयुष्य वेचणारया नाजुबाई गावित यांचा जन्म.
१९७१ : प्रसिद्ध बासरी वादक राकेश चौरसिया यांचा जन्म.
१९७४ : हृतिक रोशन सिनेकलाकार
१९८४ : भारतीय अभिनेत्री कल्कि कोचेलिन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६९३ : कोलकत्याचे निर्माते म्हणून ओळखले जाणारे जाब चारनाक यांचे निधन.
१७६० : दत्ताजी शिंदे पानिपतच्या पहिल्या संग्रामातील रणवीर (जन्म: १७२३)
१७७८ : कार्ल लिनिअस स्वीडीश वनस्पतीतज्ञ, वनस्पतींच्या दुहेरी नामकरणाची आंतरराष्ट्रीय पद्धत त्याने विकसित केली. ही पद्धत त्याला इतकी आवडली की त्याने स्वत:चेही नाव बदलून कॅरोलस लिनिअस असे केले. (जन्म: २३ मे १७०७)
१९६९ : उत्तर प्रदेश चे माजी मुख्यमंत्री संपूर्णानंद यांचे निधन.
१९९४ : ला प्रसिद्ध लेखक गिरिजाकुमार माथुर यांचे निधन.
१९९९ : आचार्य श्रीपाद कृष्ण केळकर स्वातंत्र्य सैनिक व समाजवादी विचारवंत
२००२ : पं. चिंतामणी रघुनाथ तथा सी. आर. व्यास ख्यालगायक, गुरु व बंदिशकार (जन्म: ९ नोव्हेंबर १९२४)

# 'बिस्मिल' उसाला आणखी ४ राज्यांत लागवडीसाठी मंजुरी



**दिल्ली । वृत्तसंस्था**

**'बिस्मिल' या उसाच्या नवीन वाणाच्या आणखी चार राज्यांमधील लागवडीचा मार्ग मोकळा झाला आहे. हे नवीन वाण उच्च उत्पादन देणारे व रेड रॉट प्रतिरोधक असून, ते शहाजहानपूर येथील उत्तर प्रदेश ऊस संशोधन परिषदेने विकसित केले आहे.**

याआधी हे वाण केवळ उत्तर प्रदेशमध्ये लागवडीसाठी प्रसारित करण्यात आले होते. आता या ऊस वाणास हरियाना, पंजाब, उत्तराखंड आणि राजस्थानमध्ये लागवडीसाठी केंद्रीय समितीने मंजुरी दिली आहे, अशी माहिती ऊस संशोधन परिषदेचे संचालक व्ही. के. शुक्ला यांनी दिली. भारतीय कृषी संशोधन परिषदेच्या (आयसीएआर) अखिल भारतीय समन्वयित संशोधन प्रकल्पांतर्गत हे ऊस वाण विकसित करण्यात आले आहे. या वाणाला अधिकृतपणे 'कोशा' (कोइमतूर-शहाजहानपूर) १७२३१) असे नामांकित करण्यात आले आहे. ऊस पिकांसाठी मोठा धोका असलेल्या लाल कूज (रेड रॉट) रोगासाठी हे वाण प्रतिरोधक आहे. त्याची सरासरी उत्पादन क्षमता प्रतिहेक्टर ८६.३५ टन एवढी आहे, तर साखर उतारा १३.९७ टक्के असल्याचे सांगण्यात आले आहे. या नवीन वाणामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढण्यास मदत होईल आणि साखर उत्पादनही वाढेल, असा दावा तज्ज्ञांनी केला आहे. या वाणाचे बेणे आणि रोपे उत्तर प्रदेशच्या ऊस पट्ट्यातील सर्व ४२ जिल्ह्यांमध्ये आधीच वितरित करण्यात आली आहेत. त्याचे उत्साहवर्धक परिणाम दिसून आले असल्याचे अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे. 'आयसीएआर'ने नुकतीच या ऊस वाणासह २५ पिकांच्या १८४ नव्या वाणांना मंजुरी दिली. यामुळे या वाणाचे वैज्ञानिक महत्त्व आणि त्याचा संभाव्य प्रभाव अधोरेखित होतो, असे उत्तर प्रदेश ऊस संशोधन परिषदेतील तज्ज्ञांनी म्हटले आहे.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# गहिनीनाथगडाचा भव्य विकास ही आपली मनोमन इच्छा -पंकजा मुंडे

**पाटोदा । प्रतिनिधी**

**मी पालकमंत्री असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथगडाच्या विकासासाठी निधी आणून विकास कामांना सुरुवात केली होती. एक लेक म्हणून अधिकाधिक भव्य दिव्य अशा गडाच्या विकासाची मनोमन इच्छा होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुधात साखर टाकली असून, आज जो गहिनीनाथ गडाचा विकास सुरू आहे तो एकमेव देवेंद्र फडणवीस यांच्या मुळेच शक्य झाला आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानते. त्याचबरोबर लोकांचे हे प्रेम, आशीर्वाद आणि डोळ्यातील आदर कायम राहण्याजोगे काम आपल्या हातून घडावे हीच संत वामनभाऊ चरणी आपण प्रार्थना करत असल्याची भावना राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी गहिनीनाथगडावर बोलताना व्यक्त केली.**

संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यासाठी गहिनीनाथगडावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्यासह माजी मंत्री आ. धनंजय मुंडे उपस्थित होते. प्रारंभी गहिनीनाथगडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज शास्त्री यांनी मुख्यमंत्री व पंकजाताई मुंडे यांचा यथोचित सत्कार केला. यावेळी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना पंकजाताई मुंडे यांनी आपल्या मनमोकळ्या भावना व्यक्त केल्या. संत वामनभाऊ महाराज व संत भगवानबाबा हे आपल्या सर्वांचे श्रद्धास्थान असून डोंगरदऱ्यांमध्ये, कडी -कपारींमध्ये राहणारा हा समाज ज्यांनी सुसंस्कारित केला अशा या संतांचे संस्कार देशाच्या कानाकोपऱ्यात आजही आपल्याला दिसतात. ज्या काळामध्ये माणूस माणसासारखा वागत नव्हता, त्या काळात त्यांना संस्कार देऊन सन्मार्गाला लावण्याचे काम संत भगवानबाबा आणि संत वामनभाऊ यांनी केले आहे. संत वामनभाऊ यांना वाचासिद्धी होती असे म्हणतात. आजही या संतांचे विचार हे आपल्यासाठी दीपस्तंभ असून त्यांच्या विचारावर आपली नितांत श्रद्धा आहे. त्याच आशीर्वादाने आणि श्रद्धेने आपण वाटचाल करत असल्याची ग्वाही ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी दिली.



## लेकीच्या पदरात मुख्यमंत्र्यांनी साखर टाकली!

गहिनीनाथगडाचा विकास आणि गहिनीनाथगडाची लेक म्हणून असलेल्या नात्याचा संदर्भाने बोलतांना ना.पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे एखाद्या व्यक्तीला आपल्या वडिलांना गोड धोड खाऊ घालायची इच्छा असते, त्यासाठी ती मूठभर गहू, मूठभर तांदूळ आपल्या पदरात घेऊन येते त्यात साखरेची कमी असते. ती साखर टाकण्याचे काम एक प्रकारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. त्यामुळे मी पालकमंत्री असताना गडाच्या भव्य विकासाचा घेतलेला ध्यास व माझी इच्छा पूर्णत्वास येत आहे. गहिनीनाथ गडाचा आज भव्य दिव्य विकास सुरू असून हे एकमेव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातूनच शक्य झाल्याचे ना. पंकजाताई मुंडे यावेळी म्हणाल्या.

# केंद्राने केलेला कायदा रद्द करण्याचा अधिकार जनतेला -खा.कल्याण काळे

जालना । प्रतिनिधी

भाजपने केंद्रामध्ये जनतेच्या व मजुराच्या विरोधात केलेला कायदा त्या कायदा रद्द करण्यासाठी अधिकार पण आहे जनतेला आहे यासाठी मनरेगा बचाव संग्राम आंदोलन करण्यात येणार आहे अशी माहिती काँग्रेसचे खासदार डॉ.कल्याण काळे यांनी पत्रकार परिषद मध्ये माहिती देण्यात आली यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख. राजेंद्र राख. काँग्रेसचे अध्यक्ष आतिक खान यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी होते.



जालना येथील संपर्क कार्यालयात जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी काँग्रेस पक्षातर्फे संपूर्ण देशात राबविल्या जाणाऱ्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) बचाओ संग्राम बाबत व्यापक माहिती दिली. सदरील आंदोलनाबाबत बोलताना त्यांनी सांगितले कि, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) ही ग्रामीण जनतेसाठी जीवनवाहिनी आहे. या योजनेमुळे लाखो कुटुंबांना रोजगार, आर्थिक आधार व सन्मानाने जगण्याची संधी मिळाली आहे. मात्र अलीकडे मनरेगा योजनेतील तरतुदींमध्ये केंद्र सरकारने अन्यायकारक बदल केले व सदरील योजनेचे नावही बदलून - केलेले आहे. सदरील योजनेचा मूळ उद्देश ग्रामीण भागातील मजुरांना काम करण्यासाठी त्यांचे संवैधानिक अधिकार सुनिश्चित करत होते परंतु केंद्र सरकारने अशे कोणतेही अधिकार ग्रामपंचायत व मजुरांना ठेवलेले नाही.पहिले प्रत्येक परिवाराला कमीत कमी १०० दिवसाच्या रोजगाराची कायद्याने हमी होती आता नवीन कायद्यानुसार अशी कायद्याने कोणतीही हमी नाही तसेच ग्रामपंचायतींना प्रत्येक गावात गावांच्या विकासासाठी कामे मिळत होती परंतु आता नवीन कायद्यानुसार सरकार ठरवील त्याच ग्रामपंचायतींना व सरकारने ठरवलेली कामे मंजूर होतील. मजुरांना कायद्याने ठरलेली मजुरी मिळत होती परंतु आता सरकार ठरवील त्याच दराने मजुरी मिळेल. पहिले संपूर्ण योजनेच्या कामातील मजुरी केंद्र सरकार राज्यांना देत होते परंतु आता राज्यांचा सदरील योजनेत ४०% वाटा राहणार आहे व केंद्र सरकारचा वाट ६०% राहणार आहे त्यामुळे राज्यांवर ह्या निधीचा अधिकच बोजा पडणार आहे व आर्थिक संकटात सापडलेली राज्ये ह्या योजनेतील कामांच्या शिफारसी केंद्र सरकारकडे करणार नाहीत त्यामुळे आपसूक सदरील योजना बंद करण्याचा हा केंद्र सरकारचा डाव असल्याचे लक्षात येत आहे या पार्श्वभूमीवर मनरेगा बचाव संग्राम राबविणे अत्यावश्यक असल्याचे मत मा. खासदार महोदयांनी व्यक्त केले. मनरेगा कमकुवत झाल्यास ग्रामीण बेरोजगारी वाढेल, स्थलांतर वाढेल व ग्रामविकासाला मोठा फटका बसेल, अशी चिंता त्यांनी व्यक्त केले मनरेगा ही केवळ रोजगार योजना नसून ग्रामीण विकास, जलसंधारण, मृदसंवर्धन व पर्यावरण रक्षणाची प्रभावी साधन आहे. त्यामुळे सर्व लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था व नागरिकांनी मनरेगा बचाव संग्रामात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन मा. खासदार कल्याण काळे यांनी केले आहे

# कंठेश्वरात शॉर्टसर्किटमुळे घराला आग; संसारोपयोगी साहित्य, रोकड जळून खाक

परभणी । प्रतिनिधी

पूर्णा तालुक्यातील कंठेश्वर येथे शुक्रवारी (दि. ९) रात्री सुमारे १० वाजता शॉर्टसर्किटमुळे एका घराला अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत घरातील संपूर्ण संसारोपयोगी साहित्य व रोख रक्कम जळून खाक झाली असून अल्पभूधारक शेतकऱ्याचे सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, कंठेश्वर येथील अल्पभूधारक शेतकरी यशवंत सूर्यभान कदम यांच्या घरात रात्री अचानक शॉर्टसर्किटमुळे आग लागली. घटनेच्या वेळी शेतकऱ्याची पत्नी व दोन मुले घरात झोपलेली होती. मात्र घरात अचानक आग भडकल्याचे लक्षात येताच सर्वजण घाबरून उठले व प्रसंगावधान राखत जीव वाचवण्यासाठी बाहेर पडले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आगीची माहिती मिळताच गावातील तरुणांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन स्वतःचा जीव धोक्यात घालून आग आटोक्यात आणली. मात्र, तोपर्यंत घरातील संपूर्ण संसारोपयोगी साहित्य, मुलांची शैक्षणिक कागदपत्रे, सुमारे ५० हजार रुपयांची रोख रक्कम तसेच एक मोबाईल फोन जळून खाक झाला. या घटनेनंतर शेतकरी यशवंत कदम यांचा संसार पूर्णपणे उघड्यावर आला असून मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळे गावासह परिसरात शेतकरी वर्गातून तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# गंगाभारती महाराज पतसंस्थेच्या ठेवीदारांचा एल्गार

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण, प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ठेवीदारांमध्ये तीव्र संताप

बीड प्रतिनिधी

बीड तालुक्यातील गंगाभारती महाराज ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेत झालेल्या कोट्यावधी रुपयांच्या अपहारप्रकरणी अद्यापही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संतप्त ठेवीदारांनी आता आरपारच्या लढ्याचा पवित्रा घेतला आहे. या अन्यायाविरोधात बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात आले. युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष श्री. हरिओम क्षीरसागर यांनी निवेदनाद्वारे आंदोलनाचा इशारा दिला होता.




मार्च २०२३ मध्ये करचोंडी (मुख्य शाखा), लिंबागणेश, मांजरसुंबा, चौसाळा व पिंपळवाडी या शाखांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आला होता. या पतसंस्थेत गरीब शेतकरी, कष्टकरी मजूर, विधवा महिला तसेच वृद्ध नागरिकांनी आपल्या आयुष्याची कमाई विश्वासाने जमा केली होती. मात्र मुलांचे शिक्षण, लग्नकार्य व औषधोपचारासाठी ठेवलेली ही रक्कम पतसंस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व कर्मचाऱ्यांनी संगनमताने हडप केल्याचा गंभीर आरोप ठेवीदारांनी केला आहे. या अपहारप्रकरणी दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांविरोधात नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.नं. ००४५/२०२४) दाखल करण्यात आला आहे. मात्र तब्बल दोन वर्षांचा कालावधी लोटूनही आरोपी अद्याप फरारच आहेत. पतसंस्थेचे अध्यक्ष सुभाष विठ्ठलराव शिंदे, उपाध्यक्ष रामेश्वर सोनाजी ढेरे, व्यवस्थापक बंकट नारायण शिंदे तसेच इतर संचालक मंडळ मोकाट फिरत असताना पोलिसांकडून अटक का होत नाही? असा संतप्त सवाल ठेवीदार उपस्थित करत आहेत. या प्रकरणात नियुक्त करण्यात आलेले प्रशासक पूर्णतः निष्क्रिय असून, लेखापरीक्षक अधिकारी जाणीवपूर्वक अहवाल सादर करत नसल्याचा आरोप ठेवीदारांच्या निवेदनात करण्यात आला आहे. यापूर्वी १५ ऑगस्ट २०२५ रोजी पालकमंत्री अजितदादा पवार यांनाही निवेदन देण्यात आले होते. मात्र केवळ आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. ९ जानेवारी रोजी आंदोलन करण्यात येणार असल्याबाबत जिल्हा उपनिबंधक यांना निवेदन देण्यात आले होते. यापुर्वी १९ डिसेंबर रोजी पुन्हा निवेदन देऊनही प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याशी चर्चा करून आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले होते. मात्र त्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. अनेक ठेवीदारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. न्याय मिळेपर्यंत आता शांत बसणार नाही. प्रशासनाने तात्काळ आरोपींना अटक करून त्यांची मालमत्ता जप्त करावी व ठेवीदारांचे पैसे व्याजासह परत करावेत, असा ठाम इशारा युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांनी दिला आहे.

# उदगीरमध्ये ११ लाखांच्या गुटख्यासह मुद्देमाल जप्त

लातूर । प्रतिनिधी

शासनाने बंदी घातलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ घेऊन जाणाऱ्या कारचा पाठलाग करून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी वाहन व गुटखा असा एकूण ११ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. कारवाई ८ जानेवारी रोजी करण्यात आली. यातील आरोपी फरार झाला आहे.

उदगीर शहरातील उमा चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक यादरम्यान एका कारमधून प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होत असल्याची माहिती खबऱ्याकडून मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखाली उमा चौक परिसरात पोलिसांच्या पथकाचा सापळा रचण्यात आला. खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे पांढऱ्या रंगाची कार एमएच २४ एएफ ४६०० आल्यानंतर पोलिसांनी थांबविण्याचा प्रयत्न केला. मात्र कार चालकाने एका ठिकाणी गाडीला धक्का देऊन गल्लीबोळातून पोबारा केला. पोलिसांनी कारमधून प्रतिबंधित असलेला ४ लाख ९४९६ रुपयांचा गुटखा आणि कार असा एकूण ११ लाख ९४९६ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी माधव तुकाराम मोरे (वय अंदाजे ३२, रा. जांब बु., ता. मुखेड, जि. नांदेड) याच्याविरुद्ध पोलीस ठाणे उदगीर शहर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. सदरची कारवाई पोलिस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पथकामधील पोलीस अंमलदार साहेबराव हाके, रियाज सौदागर, मनोज खोसे, आनंद हल्लाळे यांनी केली.

# भावजयीसोबतचे संबंध उघड होण्याच्या भीतीने पुतण्याचा खून

**धाराशिव । प्रतिनिधी**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी गावात मानवतेला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. भावजयीसोबतचे अनैतिक संबंध उघड होण्याच्या भीतीपोटी चुलत्याने आपल्या अवघ्या १३ वर्षीय पुतण्याची कुऱ्हाडीने निघृण हत्या केल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

ओमकार देवीदास कांबळे (रा. कोळसुर, ता. उमरगा) असे आरोपीचे नाव असून, त्याने कृष्णा सदानंद कांबळे (वय १३) या पुतण्याचा खून केला. कृष्णाला आपल्या आई ज्योती कांबळे व चुलते ओमकार कांबळे यांच्यातील अनैतिक संबंधांची माहिती होती. ही बाब तो वारंवार आपल्या वडिलांना सांगत असल्याने आरोपीच्या मनात राग व भीती निर्माण झाली होती. ही घटना सोलापूर- धुळे राष्ट्रीय महामार्गालगत तामलवाडी शिवारातील एका शेतात घडली. ओमकारने विद्युत पंपाचा पाईप बसवायचा आहे, असा बहाणा करून कृष्णाला साठवण तलावाजवळ नेले. परिसरात कोणी नसल्याची खात्री करून त्याने कुऱ्हाडीने वार करत कृष्णाची जागीच हत्या केली. त्यानंतर मृतदेह गवतात लपवून आरोपी फरार झाला. तलावाजवळील गवतात बालकाचा मृतदेह आढळल्यानंतर तामलवाडी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. तपासात मयताची ओळख पटली. तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी कोळसुर येथून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली. अवघ्या २४ तासांत आरोपीला अटक करण्यात आली असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

# हिंगोली नगरपरिषदेच्या निवडणुकीत बोगस मतदान; सीसीटिव्हीमध्ये धक्कादायक प्रकार कैद

हिंगोली । प्रतिनिधी

हिंगोली नगरपरिषदेच्या निवडणुकीत धक्कादायक प्रकार घडला आहे. हिंगोली नगरपरिषदेच्या वॉर्डक्रमांक १७-अ मध्ये बोगस मतदान झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, हा प्रकार थेट सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. विशेष म्हणजे, मतदारांच्या ऐवजी उमेदवारांचे पोलिंग एजंटच मतदान करत असल्याचे दृश्य व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसत आहे.

या प्रकरणी संबंधित वॉर्डातील उमेदवार सैय्यद जावेद यांनी थेट निवडणूक यंत्रणांवर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, मतदान केंद्रातील कर्मचारी आणि उपविभागीय अधिकारी यांची संगनमताने ही प्रक्रिया पार पाडली. जावेद यांनी या प्रकरणी याचिका दाखल केली असून, संपूर्ण निवडणूक प्रक्रियेची चौकशी करण्याची मागणी केली आहे. समोर आलेल्या सीसीटीव्ही व्हिडिओमध्ये एकच व्यक्ती वेगवेगळ्या मतदारांच्या नावाने वारंवार मतदान करताना दिसत आहे. हा प्रकार एक-दोन वेळा नाही, तर दोन-तीन वेळा झाल्याचे दिसत आहे. त्यामुळे ''मतदान केंद्रावर उपस्थित कर्मचारी आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांनी जाणीवपूर्वक डोळेझाक केली,'' असा गंभीर आरोप जावेद यांनी केला आहे. या घटनेमुळे आता इतर वॉर्डांतही अशीच बोगस प्रक्रिया राबवली गेली असावी का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. स्थानिक नागरिकांमध्येही नाराजीचा सूर असून, निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, सैय्यद जावेद यांनी मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी, महाराष्ट्र यांच्याकडे लेखी मागणी करत, वॉर्ड क्रमांक १७-अ मधील निवडणूक रद्द करून फेरमतदान घ्यावे अशी मागणी केली आहे. लोकशाहीच्या विश्वासार्हतेसाठी या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे अत्यावश्यक असल्याचे ते म्हणाले. आता या प्रकरणावर निवडणूक आयोग आणि प्रशासनाची पुढील भूमिका काय असणार, दोषींवर कारवाई होते का, तसेच फेरमतदानाचा निर्णय घेतला जातो का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

रजि.नं. यु.६५९९९एमएच २०१८पीएलसी ३१६७५६

**बीड अर्बन निधी लि.**

विठ्ठल रुक्माई मंदिरा शेजारी, मेन रोड, सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड

फोन नं. ०२४४७-२५६००३ / मो. नं. ९४०३४८३८१४

**सोने तारण लिलाव नोटीस**

बीड अर्बन निधी लि. खाली नमुद केलेल्या सोने तारण / रोखपत सोने तारण कर्जदारांनी सदर निधी कडून घेतलेल्या कर्जाची व व्याजाची वेळेवर परतफेड न केल्याने कर्ज रक्कम थकबाकी झालेली आहे. कर्ज वसुली करिता संबंधीत कर्जदारांना वारंवार लेखी नोटीस देऊन सुध्दा प्रतिसाद न दिल्याने सदर निधीचे कर्ज वसुली करिता तारण ठेवलेल्या सोने / दागीन्यांचा लिलव मंगळवार दिनांक २७.०१.२०२६ रोजी सदर निधीच्या मुख्य कार्यालयात दुपारी ०२.३० वा. करण्याचे निश्चित केलेले आहे. तरी इच्छुकांनी वरील पत्यावर लिलावावेळी उपस्थित रहावे.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव | कर्ज क्रमांक |
|---|---|---|
| १. | वाघमारे अमोल महादेव | ००१०४००६०००१०० |
| २. | नवले अनंत जयदत्त | ००१०४००६००००७८ |

**अटी व शर्ती**

१. लिलावा पूर्वी १०,०००/- रु. अनामत रक्कम जमा करणे आवश्यक आहे. २. लिलाव प्रक्रियेत भाग घेण्याची फि रु. ११८०/- जी.एस.टी.स. घेण्यात येईल. ३. इच्छुक खरेदीदारांनी (केवायसी नियमा प्रमाणे) स्वतःचे ओळखपत्र व निवासाचा पुरावा घेऊन येणे आवश्यक आहे. ४. सोने विक्रीसाठी लिलाव धारकांचे बिड रक्कम अंतिम झाल्यास त्वरीत पैशाचा भरणा संबंधीत कर्ज खात्यावर करावा लागेल.५. लिलाव करण्याचे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार सदर निधीस / अधिकृत अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत. या संदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार स्विकारली जाणार नाही. तसेच कोणतेही स्पष्टीकरण दिले जाणार नाही.

ठिकाण : सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड

दिनांक :

**स्वाक्षरित/-**
**कार्यकारी संचालक**
**बीड अर्बन निधी लि. सिरसमार्ग, ता. गेवराई, जि. बीड.**

# सिस्पे घोटाळ्यावरून खासदार लंकेचा विरोधकांवर पलटवार

## सिस्पे घोटाळ्याच्या चौकशीचे स्वागत, खा. लंके यांनी मानले मुख्यमंत्र्यांचे आभार

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सिस्पे घोटाळ्याच्या चौकशीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या घोषणेचे स्वागत करत खासदार नीलेश लंके यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले आहेत. पत्रकारांशी बोलताना खा. लंके म्हणाले की, शिस्पे घोटाळ्यात सर्वसामान्य नागरिकांचे कष्टाचे पैसे अडकले असून अनेकांनी दोन पैशांच्या आशेने गुंतवणूक केली आणि त्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले. काही दुर्दैवी ठेवीदारांनी आत्महत्येचा टोकाचा निर्णय घेतला. त्यामुळे या घोटाळ्याची सखोल, निष्पक्ष चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे.

खा. लंके म्हणाले, ''ज्यांनी हा घोटाळा केला आहे, त्यांना अटक झाली पाहिजे आणि त्यांच्याकडून ठेवीदारांचे पैसे वसूल करून सर्वसामान्य नागरिकांना परत मिळाले पाहिजेत.'' सिस्पे घोटाळा उघडकीस आल्यानंतर आपण काही ठेवीदारांना सोबत घेऊन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली होती. हा विषय राजकीय न करता केवळ ठेवीदारांचे पैसे मिळवून देणे हीच आपली भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विरोधकांकडून आपल्यावर बिनबुडाचे आरोप केले जात असून राजकीय आकसापोटी आपल्याकडे बोट दाखवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत खा. लंके यांनी विखे पिता-पुत्रांवर अप्रत्यक्ष टोला लगावला. ''स्वतःचे झाकून ठेवायचे आणि दुसऱ्यांचे उघडे करायचे, हीच त्यांची सवय आहे,'' असे ते म्हणाले. खा. लंके पुढे म्हणाले की, सिस्पे प्रकरण अतिशय गंभीर आहे. मात्र जेव्हा केंद्रीय मंत्री लोणी किंवा कोपरगावच्या दौऱ्यावर येतात, तेव्हा त्यांना सिस्पे घोटाळ्याच्या चौकशीसाठी निवेदन का दिले जात नाही, असा सवाल त्यांनी विखे यांचे नाव न घेता उपस्थित केला.



ठेवीदारांचे पैसे मिळवून देण्याऐवजी काहीजण पालकमंत्र्यांच्या माध्यमातून राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोपही त्यांनी केला. मतदारांचे लक्ष विचलित करण्यासाठी डाव आखले जात असले तरी नगर जिल्ह्यातील मतदार सुज्ञ असून भाजपची खेळी सर्वांनी ओळखली असल्याचे लंके यांनी सांगितले. नगर येथील सभेत मुख्यमंत्री शहरातील रस्ते घोटाळ्यावर एक शब्दही न बोलल्याची टीकाही त्यांनी केली. जिल्ह्यात दहा लाखांपासून एक कोटी रुपयांपर्यंतच्या ऑनलाईन फसवणुकीचे प्रकार घडले असून त्यासंदर्भात गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणांचीही सखोल चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी खा. लंके यांनी केली. ग्रो मोअर इन्व्हेस्टमेंट फायनान्स कंपनीने शिर्डीसह इतर जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर फसवणूक केली असून सुमारे ३०० कोटी रुपयांचा हा घोटाळा असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेवगाव येथे शेअर मार्केटच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून त्याची चौकशी सीबीआयकडे देण्यात यावी, अशी आग्रही मागणी त्यांनी केली. दरम्यान, शिस्पे इन्फिनिटी घोटाळ्याशी आपला कोणताही संबंध नसल्याचे खा. नीलेश लंके यांनी ठामपणे स्पष्ट केले. केवळ इन्फिनिटीच्या उद्घाटनाला उपस्थित राहिलो म्हणून जाणीवपूर्वक बदनामी केली जात असून हा राजकीय हेतूने चालवलेला खोटा प्रचार असल्याचे त्यांनी सांगितले. उद्घाटन कार्यक्रमाला विविध पक्षांचे आमदार, खासदार, सामाजिक कार्यकर्ते व पोलीस अधिकारी उपस्थित होते. ''उद्घाटनाला उपस्थित राहणे म्हणजे घोटाळ्यात सहभागी असणे नव्हे,'' असेही त्यांनी स्पष्ट केले.

आपण किंवा आपल्या सहकाऱ्यांनी कोणालाही पैसे गुंतवण्यास प्रवृत्त केलेले नसून, उलट ठेवीदारांचे पैसे परत मिळावेत यासाठी सातत्याने प्रयत्न केले असल्याचे त्यांनी नमूद केले.

# रेन्यू पॉवर कंपनीची मनमानी: संमती न घेता वहीती शेतात उभे केले विद्युत पोल

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्याची संमती न घेता सामूहिक शेती असलेल्या ठिकाणी पवन ऊर्जा निर्मिती करणाऱ्या रेन्यू पॉवर या कंपनीचे बीड तालुक्यातील मोरगाव हद्दीमध्ये कार्यालय असून तेथील संबंधित गुत्तेदाराने मनमानी करत शेतकऱ्यांची पूर्ण परवानगी न घेता वहीत शेतामध्ये विद्युत पूल उभे केले असून ते पोल काढून टाकण्याची मागणी शेतकऱ्याने केली आहे सदर निवेदन संबंधित कंपनी जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक,नेकानूर पोलीस स्टेशन तहसीलदार बीड यांना दिले आहे.




खंडाळा तालुका बीड येथील शेतकरी विलास नरहरी चौरे यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केल्या रिन्यू पावर कंपनी ही सौर ऊर्जा (पवनचक्की) निर्माण करणारी कंपनी असून या कंपनीचे मोरगाव हद्दीमध्ये मांजरसुंबा लिंबागणेश रस्त्यावर कार्यालय असून या कंपनीने विद्युत लाईन ओढण्यासाठी काही कंत्राटदाराची नेमणूक केली आहे प्रामुख्याने ज्यांच्या वहीती असलेल्या शेतामधून किंवा मालकी हक्कातून पोल किंवा लाईन ओढली जाणार आहे त्यापूर्वी संबंधित शेतकऱ्याची परवानगी घेणे बंधनकारक असताना या कंपनीने मनमानी करत गुत्तेदाराकरवी नियमबाह्यरित्या विद्युत पोल उभे केले आहेत विशेषतः हे पोल उभे करताना ज्या गटातून शेतातून विद्युत लाईन किंवा पॉल उभे केले जाणार आहेत त्या शेतकऱ्यांची ◄◄ पान ३ वर



श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथे वैराग्यमूर्ती श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ५० व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला,यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी हेलीपॅडवर मुख्यमंत्र्यांचे स्वागत केले,यावेळी महंत विठ्ठल महाराज



**गेवराई : तालुक्यातील केकत पांगरी येथील तुषार लगड यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत पंचायत समिती गटविकास अधिकारी ( ) पदी निवड झाल्याबद्दल त्यांच्या केकत पांगरी येथील निवासस्थानी भेट देऊन त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी नाळवंडीचे सरपंच ॲड. राजेंद्र राऊत, सुलतानपूरचे सरपंच धनेश्वर खेत्रे, लक्ष्मण राऊत, धर्मराज दुधाळ, सुधीर शिंदे, बंटी राऊत, काळे सर तसेच केकत पांगरी येथील सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.**

# परळी पालिकेत राष्ट्रवादीने एमआयएमला गटातून हाकलून द्यावे - सचिन मुळूक

## अन्यथा शिवसेनेला गटातून बाहेर पडण्याची परवानगी द्या, आम्ही बाहेरून पाठिंबा देऊ : शिवसेनेची भूमिका

बीड । प्रतिनिधी

परळी नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवून सत्ता स्थापन केली. मात्र सत्तास्थापनेनंतर गटनेता निवडीच्या प्रक्रियेत शिवसेनेला विश्वासात न घेता एमआयएमला गटात सामावून घेण्यात आल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिली. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेत्यांनी तातडीने एमआयएमला गटातून वगळावे, अन्यथा



शिवसेनेला गटातून बाहेर पडण्याची परवानगी द्यावी; आम्ही बाहेरून पाठिंबा देऊ, अशी स्पष्ट भूमिका मुळूक यांनी शुक्रवारी (दि. १०) पत्रकार परिषदेत मांडली. यावेळी परळी तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, शहर प्रमुख वैजनाथ माने उपस्थित होते.

सह्याद्री निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेत मुळूक म्हणाले की, परळी नगरपालिका निवडणुकीत ◄◄ पान ३ वर

### दानवेंनी स्वत:चे डोके तपासावे

परळी पालिका निवडणुकीत १६ नगरसेवक निवडून आल्याने राष्ट्रवादी सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. या मुळे गटनेता राष्ट्रवादीच्या होणार हे सर्वश्रुत आहे ही साधी बाब विरोधी पक्षनेता राहिलेल्या अंबादास दानवे यांना कळत नसेल तर त्यांनी स्वत:चे डोके तपासून घ्यावे. परळीत त्यांचा पक्ष औषधालाही राहिला नाही. दानवेंनी स्वत:चा पक्ष कसा वाढेल यावर लक्ष केंद्रीत करावे. उबाठाने संभाजीनगरमध्ये रशिद मामू सारख्या दंगलखोर उमेदवारला उमेदवारी दिली. याचा प्रचार करताना अंबादास दानवे यांना लाट वाटत नाही का असेही मुळूक म्हणाले.

### जिल्हाधिकाऱ्यांकडे म्हणणे मांडणार

परळी पालिकेतील गटनेता निवडीदरम्यान शिवसेनेला अंधार ठेवून एमआयएमच्या नगरसेवकाला गटात घेण्यात आले. या प्रकरणी वरिष्ठ नेत्यांच्या सूचनेवरुन सोमवारी (दि.१२) जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहोत. यावेळी शिवसेनेच्या दोन्ही नगरसेवकांच्या सह्यांनी शपथपत्र सादर करून अधिकृत भूमिका मांडण्यात येईल, असे मुळूक यांनी सांगितले.

# गणेश डोंगरे यांच्या कुटुंबाला २१ लाखांची मदत

## आक्रमक आंदोलनामुळे कारखाना प्रशासन नमले

वडवणी । प्रतिनिधी

''न्याय मागून मिळत नाही, तो संघर्षाने खेचून आणावा लागतो,'' याची प्रचिती आज पुन्हा एकदा आली आहे. प्रसिद्ध रीलस्टार आणि कष्टकरी ऊसतोड मजूर गणेश डोंगरे यांच्या दुर्दैवी अपघाती निधनानंतर, त्यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी पुकारलेल्या आंदोलनाला मोठे यश आले आहे. साखर कारखाना प्रशासनाने आंदोलकांच्या कणखर भूमिकेपुढे नमते घेत, शनिवारी (दि. १०) पहाटे डोंगरे यांच्या कुटुंबाला २१ लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश सुपूर्द केला.

आपल्या रील्सच्या माध्यमातून साध्या भोळ्या स्वभावाने सोशल मीडियावर लोकप्रिय झालेले गणेश डोंगरे यांचा ऊसतोडणी दरम्यान अपघाती मृत्यू झाला होता. एका गरीब आणि कष्टाळू कुटुंबाचा आधार गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत होती. मात्र, कारखाना प्रशासनाकडून सुरुवातीला मदतीबाबत योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने जनक्षोभ उसळला होता.

रात्रभर चालले आंदोलन

गणेश डोंगरे यांच्या कुटुंबाला सन्मानजनक मदत मिळावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते आणि आंदोलकांनी कारखान्यावर ठिय्या मांडला होता. प्राचार्य सोमनाथ भाऊ बडे,भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय भाऊ आंधळे, कृष्णा तिडके, माऊली सिरसाट,मा.नगरसेवक सतीश बप्पा बडे,उपसंपादक अशोक अप्पा निपटे,सा.बीड गदर व गदर न्यूज चॅनेलचे ◄◄ पान ३ वर



# प्रलंबित फेरफार, कार्यालयात गैरहजेरी चालणार नाही–जॉन्सन

## आष्टी दौऱ्यात जिल्हाधिकाऱ्यांचा प्रशासनाला कडक इशारा

आष्टी । प्रतिनिधी

कार्यालयात बसून काम न करणारे अधिकारी, प्रलंबित फेरफार व नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष खपवून घेतले जाणार नाही, असा कडक इशारा जिल्हाधिकारी मा. विवेक जॉन्सन यांनी आष्टीपाटोदा तालुका दौऱ्यात दिला.

दि. ०९ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी पाटोदा व आष्टी तालुक्यात विविध ठिकाणी पाहणी करून प्रशासनाचा थेट आढावा घेतला.सकाळी पाटोदा तालुक्यातील श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, चिंचोली येथे ह.भ.प. संत वामनभाऊ महाराजांच्या ५० व्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्याच्या सांगता कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नियोजित दौऱ्याच्या तयारीची पाहणी करण्यात आली.यानंतर आष्टी तालुक्यातील खुंटेफळ साठवण तलाव प्रकल्पास भेट देऊन प्रकल्पग्रस्त नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या.दुपारी २.३० ते ५.०० या वेळेत आष्टी तहसील कार्यालयात जनता दरबार घेण्यात आला. यावेळी तालुक्यातून आलेले एकूण ७३ अर्ज जिल्हाधिकाऱ्यांनी स्वीकारले. प्रत्येक अर्जावर संबंधित विभागांनी तात्काळ व वेळेत कार्यवाही करावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्या.सायंकाळी आष्टी–पाटोदा–शिरूर कासार तालुक्यातील बँकर्स व तालुका कृषी अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन मुद्रा लोन व वित्तीय योजनांचा आढावा घेण्यात आला. लाभार्थ्यांना अडवणूक न करता कर्ज वितरण करावे,असे निर्देश देण्यात आले. यानंतर झालेल्या मंडळ अधिकारी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.अधिकारी मूळ ठिकाणी उपस्थित राहिलेच पाहिजेत, प्रलंबित फेरफार ठराविक कालावधीत ◄◄ पान ३ वर



# आनंदऋषीजी नेत्रालय व व्हिजन सेंटर माजलगावचा पाचवा वर्धापन दिन

## मोफत नेत्र तपासणी व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया

माजलगाव । प्रतिनिधी

जैन सोशल फेडरेशन अहमदनगर संचलित राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीची नेत्रालय हॉस्पिटलमध्ये ३६५ दिवस २४ तास आरोग्य सेवेचा यज्ञ अखंड सुरू आहे.

काल माजलगाव येथील आनंदऋषीजी नेत्रालय व्हिजन सेंटर यांचा पाचवा वर्धापन दिन साजरा झाला असून आजपर्यंत पाच वर्षाच्या कार्य काळामध्ये माजलगाव येथील आनंदऋषीजी नेत्रालय व व्हिजन सेंटर माजलगाव येथे पंचावन्न हजार दोनशे चौतीस रुग्णांची नेत्र तपासणी व सात हजार तेरा रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया माजलगाव व्हिजन सेंटरच्या मार्फत झाली असून आज त्या रुग्णांना कायमची दृष्टी आल्याने गोरगरीब रुग्णांमध्ये आनंद व्यक्त होत असून अल्प दरात तज्ञ डॉक्टरांकडून शस्त्रक्रिया करून आनंदऋषीजी नेत्रालय अहमदनगर ही संस्था महाराष्ट्र भरात अतीप्रसिद्ध झाली असून वाढत्या ◄◄ पान ३ वर



# पंढरीच्या पांडूरंगाचे निस्सीम भक्त बिभीषण महाराज कराड अनंतात विलीन

परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील तपोवन येथील रहिवासी व पंढरपूरच्या पांडूरंगाचे निस्सीम भक्त ह.भ.प.बिभीषण महाराज कराड यांचे शनिवार दि.१० जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता वयाच्या ९० व्या वर्षी वृध्दपकाळाने दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दुपारी ठीक १२ वाजता तपोवन येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या अंत्यविधीला तपोवन सह परिसरातील गावचा जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता.ते पंढरपूरच्या पांडूरंगाचे निस्सीम भक्त होते. आयुष्यभर त्यांनी पंढरपूरची वारी चुकी दिली नाही.ते आळंदी व पैठणच्या वारीला सुध्दा अखंडपणे जात असत.त्यांच्या गळयात असलेल्या अनेक



लहानमोठ्या तुळशीच्या माळा व खांद्यावर कायम भगवी पताका यामुळे ते सर्व सुपरिचित होते.त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात दोन भाऊ,दोन मुले, सुना, नातवंडे,पुतणे असा भरगच्च परिवार आहे. सोमवार दि.१२ जानेवारी रोजी सकाळी ठीक ७:३० राख सावडण्याचा कार्यक्रम होणार आहे.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत रूख्माईगोविंद मतिमंद विद्यालयाची दमदार कामगिरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत राजे संभाजी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचालित 'रूख्माईगोविंद मतिमंद निवासी विद्यालय, पांगरी रोड, बीड' या शाळेच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या नावाला गौरव मिळवून दिला आहे.

या स्पर्धेत अर्जुन विक्रम मोमीन याने गोळा फेक सुवर्ण पदक,लांब उडी रौप्य पदक अशी दुहेरी पदक कमाई करत उत्कृष्ट कामगिरी केली. गोळा फेक प्रकारात सुवर्ण पदक मिळवल्यामुळे अर्जुनची राज्यस्तरीय दिव्यांग क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.तसेच लक्ष्मी बाबुराव कदम हिने सॉफ्ट बॉल थ्रो रौप्य पदक पटकावून शाळेचा नावलौकिक वाढवला.तर प्रांजल उमाकांत खोडवे हिने स्पॉट जंप कांस्य (ब्रॉंझ) पदक मिळवून यशाची परंपरा कायम राखली.सांस्कृतिक महोत्सवामध्ये सादर केलेले कांतारा चित्रपटातील वराह रूपम या सादरीकरणाला द्वितीय क्रमांक मिळाला आणि अवनी फाउंडेशन यांच्याकडून २००१ रुपये रोख रक्कम मिळाली.

या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव शिवाजी चव्हाण , शाळेचे मुख्याध्यापक संतोष धनवटे , मानस शास्त्रज्ञ व प्रशिक्षक महादेव गोडसे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.




# हरित माजलगावसाठी महिलांचेही योगदान; माहेश्वरी महिला मंडळाने केले वृक्षारोपण

**माजलगाव । प्रतिनिधी**

रोटरी क्लब माजलगाव सेंट्रल व पत्रकार संघ माजलगाव यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेल्या ''हरित माजलगाव'' साठी शहरातील महिला ही सरसावल्या असून माहेश्वरी महिला मंडळ माजलगाव यांच्या योगदानातून मंडळाच्या अध्यक्षा माया चांडक यांच्या हस्ते शहरातील जुना मोंढा भागातील कॉलनीमध्ये नुकतेच विविध ११ झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.

केशरआंबा जांब जांभूळ आवळा चिक्कू या फळ झाडासह चाफा पांढरी कन्हेरी या फुल झाडांचे कॉलनीतील रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करण्यात आले, यावेळी कॉलनीतील महिलांनी वृक्षारोपण केलेल्या या झाडांचे ट्री गार्ड लावून संगोपन करण्याची हमी घेतली.



यावेळी माहेश्वरी महिला मंडळाच्या सचिव श्रीमती सरोज तोषनीवाल उपाध्यक्षा सौ. सविता रांदड सहसचिव अनिता लोहिया कोषध्यक्ष सौअर्चना कलंत्री इतर पदाधिकारी अनिता मुंदडा वर्षा बजाज अलकनंदा मानधणे सह गीता पिलाजी जागृती बोबडे विजयालक्ष्मी इंदानी नंदा मानधने स्नेहा तोषनिवाल अर्चना करवा सौ. वैजवाडे इत्यादी कॉलनीतील महिला उपस्थित होत्या.

किमान १४ रोपांचे वाण देऊन संक्रांतीचे वाण लुटा.!

प्रत्येक वर्षी आपण १४ जानेवारीच्या संक्रान्त सणाला विविध वस्तूंचे सुवासिनींना वाण देऊन पवित्र संक्रांती साजरी करतो संक्रांतीचे वाण लुटतांना त्यात अनेक प्लास्टिक वस्तूंची लयलूट असते चार आठ दिवसाच्या या आनंदाच्या सणात अनुपयोगी स्वस्त प्लास्टिकच्या वस्तूंचा सर्रास वापर पर्यावरणाच्या दृष्टीने हानिकारक असतो, त्यामुळे यावर्षी संक्रांतीच्या पवित्र सणाला माजलगाव शहरातील सुवासीनींनी किमान १४ विविध फळ व फुलांच्या झाडांच्या रोपे देऊन वाण लुटावे ज्यात तुळस मोगरा कन्हेरी केशरआंबा जांब जांभूळ चिक्कू संत्रा मोसंबी सिताफळ लिंबू कडीपत्ता आवळा अशा विविध प्रकारच्या रोपांचा यात समावेश करता येईल जी रोपे स्त्रिया आपल्या अंगणात बागेत लावून पर्यावरणाचे रक्षण करतील.आपले हे अनोखे वाण हरित माजलगाव साठीही पूरक राहील असे आवाहन माजलगाव माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ.माया पांडुरंग चांडक यांनी केले आहे.




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ...तेव्हा भाजप एकनाथ शिंदेंना लाथा घालून बाहेर काढेल; संजय राऊतांचा पुण्यातून घणाघात, अजित पवारांवर हल्लाबोल

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबई तोडता येणार नाही म्हणून शिवसेना फोडल्याचे मत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी व्यक्त केले. अमित शाहांनी मुंबई लुटली आहे. अमित शाह यांच्या कंपनीला एकनाथ शिंदेनी पक्ष आणि चिन्ह दिलं आहे. शिवसेना हे चिन्ह आपल्याला परत द्यावे लागणार आहे. ज्यादिवशी हे चिन्ह एकनाथ शिंदीकडून जाईल तेव्हा भाजप एकनाथ शिंदे यांना लाथा घालून बाहेर काढेल अशी टीका देखील संजय राऊतांनी केली. लोकशाही भाजपच्या बापाची आहे का? महाराष्ट्र तुमच्या बापाचा आहे का? असे सवाल करत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. ते पुण्यात बोलत होते. भाजपला नगरपालिका, ग्रामपंचायत सगळी सत्ता हवी आहे. सर्व भ्रष्टाचाऱ्यांना सोबत घेतात आणि सत्तेत बसवतात. सत्तेत बसवलेले अजित पवार हे ज्वलंत उदाहरण आहे, असा टोला देखील त्यांनी लगावला.



अजित पवार यांच्यावर भाजपने ७० हजार कोटींचा आरोप केला आणि नंतर तेच उपमुख्यमंत्री झाले. व्हाइट पेपर काढलं देशातलं तर सगळ्यात मोठा घोटाळा अशोक चव्हाणांनी केला ते आज भाजपमध्ये गेलेत असे राऊत म्हणाले. भाजपचा फेकनामा प्रसिद्ध केला आहे. याला साहित्य अकादमीचा पुरस्कार दिला पाहिजे असा टोला राऊतांनी लगावला. फेकाफेकीसाठी मोदी आणि फडणवीस यांना नोबेल दिला पाहिजे असेही ते म्हणाले. आता काँग्रेसयुक्त भाजपा झाली आहे. काँग्रेसयुक्त भारत करायला निघाला होतात आता त्यांनाच आपल्यात घेतल्याचे राऊत म्हणाले. पहालगाममध्ये हिंदूंना मारले आहे. हिंदू म्हणून मारल्याचे संजय राऊत म्हणाले. ट्रम्पचा कॉल आला आणि युद्ध थांबवलं एवढा डरपोक पीएम पहिला नाही अशी टीका देखील त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केली. इंदिरा गांधींचं नाव काढलं की राग येतो त्यांना असेही राऊत म्हणाले. मुंबई महाराष्ट्राची राजधानी आणि मराठी माणसाची आहे. १०६ लोकांनी बलिदान दिलं आहे. ही मुंबई महाराष्ट्रापासून तोडायची आहे. तोडायची नाही तर केंद्रशासीत प्रदेश करायचा असल्याचे राऊत म्हणाले. अण्णा मालाई मुंबई महाराष्ट्राची नाही अस म्हणतो. तेव्हा अजित पवार, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे नामर्द सारखे उभे होते. बूटचाटे मिंधे बघत होते असी टीका राऊत यांनी केला. मुंबई मराठ्यांची शान आहे असेही राऊत म्हणाले.


# बारावीच्या परीक्षेचे हॉलतिकीट अखेर उपलब्ध; १२ जानेवारीपासून कॉलेजमध्ये मिळणार

**पुणे । प्रतिनिधी**

बारावीची परिक्षा महिन्यावर आली असताना परीक्षेचे हॉलतिकीट कधी मिळणार, असा प्रश्न विद्यार्थी विचारत होते. यावर महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने हॉलतिकीट उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या सोमवार दि. १२ पासून महाविद्यालयांच्या लॉगीनवर हॉलतिकीट उपलब्ध केले जाणार असून, विद्यार्थ्यांना कोणतेही वेगळे शुल्क न देता महाविद्यालयांमार्फत प्राप्त करता येतील, अशी माहिती महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी यांनी दिली आहे.

डॉ. माळी यांनी दिलेल्या माहितीनुसार, मंडळाशी संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालकांना फेबुवारी-मार्च २०२६ मध्ये होणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचे हॉलतिकीट उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे.

त्यानुसार परीक्षेचे हॉलतिकीट ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या https://www.mahahsscboard.in/mr या वेबसाईटवर कॉलेज लॉगीनमध्ये डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध होतील. यासंदर्भात काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा. महाविद्यालयांनी हॉलतिकीट प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यायची आहेत. हॉलतिकीट ऑनलाईन पद्धतीने प्रिंटिंग करताना विद्यार्थ्यांकडून कोणतेही वेगळे शुल्क घेऊ नये. हॉलतिकीटची प्रिंट काढून त्यावर मुख्याध्यापकांचा, प्राचार्यांचा शिक्का मारून स्वाक्षरी करावी. हॉलतिकीटमध्ये विषय व माध्यम बदल असतील तर त्यांच्या दुरुस्त्या उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळात जाऊन करून घ्यायच्या आहेत. हॉलतिकीटवरील फोटो, स्वाक्षरी, विद्यार्थ्याचे नाव यासंदर्भातील दुरुस्त्या ऑनलाईन करून घेता येणार आहेत. हॉलतिकीट विद्यार्थ्यांकडून गहाळ झाल्यास संबंधित महाविद्यालयांनी पुन्हा प्रिंट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत असा शेरा देऊन विद्यार्थ्यांना द्यायचे आहे. फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्याचा फोटो चिकटवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक, प्राचार्य यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करायची आहे. अशा स्पष्ट सूचना डॉ. माळी यांनी दिल्या आहेत.



# शिरूरमध्ये पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलांचे दागिने लंपास; दोन घटनांनी खळबळ

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुका आणि परिसरात चोरट्यांनी फसवणुकीचा नवा फंडा अवलंबला असून, पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलांचे दागिने लुटल्याच्या दोन घटना समोर आल्या आहेत. पुणे-नगर महामार्गावरील सरदवाडी आणि शिरूरमधील जोशीवाडी येथे सायंकाळच्या सुमारास या चोऱ्या झाल्या.

पहिली घटना सरदवाडीतील न्हावरा फाटा येथे घडली. रोहिणी सरोदे या घरासमोर चालत असताना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी पत्ता विचारत त्यांना संभाषणात गुंतवले आणि त्यांच्या गळ्यातील दोन तोळ्यांचे मिनी गंठण हिसकावून पोबारा केला. त्यानंतर काही वेळातच जोशीवाडी परिसरात रंजना मेंगवडे या महिलेलाही याच पद्धतीने लुटण्यात आले. दोन्ही घटनांत मिळून सुमारे चार तोळे दागिने चोरीला गेल्याने महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शिरूर पोलिसांनी घटनास्थळांचे पंचनामे केले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी सुरू आहे. अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, महिलांनी अनोळखी व्यक्तींशी बोलताना सावध राहावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. नागरिकांनी परिसरात रात्रगस्त वाढवण्याची मागणी केली आहे.

# पुणे महापालिका निवडणुकीपूर्वी पोलिसांची मोठी कारवाई; ७०६ गुन्हेगारांवर कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

आगामी पुणे महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस उप आयुक्त (परिमंडळ ०२) मिलींद मोहिते यांनी मोठी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या तब्बल ७०६ गुन्हेगारांवर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ (२) अंतर्गत कारवाई करण्यात आली.

परिमंडळ दोन अंतर्गत येणाऱ्या विविध पोलीस ठाण्यांच्या गुन्हे अभिलेखांचा आढावा घेऊन ही कारवाई करण्यात आली आहे. खून, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, मारहाण, शिवीगाळ, धमकी, बेकायदेशीर अग्निशस्त्र व लोखंडी शस्त्रांचा वापर, घरफोडी, मालमत्तेचे नुकसान, जबरी चोरी, दंगा, हल्ला, दरोड्याची तयारी, खंडणी, बेकायदेशीर दारू विक्री, दहशत माजवणे तसेच सार्वजनिक शांततेला धोका निर्माण करणाऱ्या विविध गंभीर गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या आरोपींचा यामध्ये समावेश आहे. ही कारवाई स्वारगेट (१०८), सहकारनगर (१०७), पर्वती (१००), बिबवेवाडी (१००), मार्केटयार्ड (५९), भारती विद्यापीठ (१२५) आणि आंबेगाव (१०७) या पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रातील गुन्हेगारांवर करण्यात आली असून एकूण आकडा ७०६ इतका आहे. पोलिसांनी दिनांक १५ जानेवारी रोजी आदेश काढून संबंधित आरोपींना त्यांचा मतदानाचा हक्क अबाधित ठेवत, परिमंडळ दोन अंतर्गत येणाऱ्या भारती विद्यापीठ, स्वारगेट, आंबेगाव, पर्वती, मार्केटयार्ड, बिबवेवाडी व सहकारनगर पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात प्रवेश, वास्तव्य, सार्वजनिकरित्या वावरणे, कोणत्याही सार्वजनिक कार्यक्रमात किंवा मिरवणुकीत सहभागी होणे यास सक्त मनाई करण्यात आली आहे.




तसेच सार्वजनिक शांतता भंग होईल किंवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे कोणतेही कृत्य करण्यासही बंदी घालण्यात आली आहे. या आदेशाचा भंग केल्यास संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये कठोर कारवाई करण्यात येणार आहे. याशिवाय अशाच स्वरूपाची कारवाई यापूर्वी १० जणांविरुद्धही करण्यात आलेली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अमितेश कुमार, सह पोलीस आयुक्त रंजन कुमार शर्मा आणि अपर पोलीस आयुक्त राजेश बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

# मोक्का-एमपीडीए कारवाईचा धडाका; पुणे ग्रामीण गुन्हेगारीला लगाम

**पुणे । प्रतिनिधी**


मोक्का ( महाराष्ट्र संघटित गुन्हेगारीविरोधी कायदा), तडीपारी आणि एमपीडीए (स्थानबद्धता) या त्रिसूत्री कारवाईमुळे पुणे जिल्हा पोलिसांनी जिल्ह्यातील गुन्हेगारीचे कंबरडे मोडले असल्याचे दिसून येते. ग्रामीण परिसरातील गंभीर गुन्ह्यांच्या घटनेमध्ये मोठ्या प्रमाणावर घट झाली आहे. २०२४ मध्ये ९० खुनाच्या घटना घडल्या होत्या, तर २०२५ मध्ये घट होऊन हा आकडा ८२ वर आला आहे. जबरी चोरींच्या घटनामध्ये मात्र वाढ झाल्याचे दिसते.

ग्रामीण पोलिसांसमोर आज अनेक आव्हाने उभी आहेत. झपाट्याने वाढणारे शहरीकरण, ग्रामीण भागात शिरकाव करणारी संघटित गुन्हेगारी, आंतरजिल्हा व आंतरराज्य टोळ्यांची हालचाल, अमलीपदार्थांची तस्करी तसेच मर्यादित मनुष्यबळ आणि विस्तीर्ण भौगोलिक कार्यक्षेत्र ही मोठी अडचण आहे. याशिवाय तांत्रिक गुन्हे, सोशल मीडियाचा गैरवापर आणि नागरिकांच्या वाढत्या अपेक्षाही पोलिसांसाठी कसोटी ठरत आहेत. या आव्हानांवर ग्रामीण पोलिसांनी प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई, गुन्हेगारांची हिस्ट्रीशीट तपासणी, रात्रीचे गस्त पथक, गुप्त माहितीवर आधारित धडक कारवाया आणि नागरिकांशी समन्वय साधत मात केली आहे. कायद्याचा धाक, तंत्रज्ञानाचा वापर आणि तत्पर तपासामुळे गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यात पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांच्या मार्गदर्शनात ग्रामीण पोलीस यशस्वी ठरत आहेत.

# पुण्यात पद्मभूषण माधव गाडगीळांच्या अंत्यविधीला अवघे ५० लोक, एकही स्थानिक नेता नाही

**पुणे । प्रतिनिधी**

भारताचे ज्येष्ठ पर्यावरणशास्त्रज्ञ, पश्चिम घाट तज्ज्ञ समितीचे अध्यक्ष, नामवंत विचारवंत आणि निसर्गप्रेमी डॉ. माधव गाडगीळ (चरवहर्री सरवसळश्र) यांचे तीन दिवसांपूर्वी अल्पशा आजाराने निधन झाले. वयाच्या ८३ व्या वर्षी त्यांनी पुण्यातील डॉ. शिरीष प्रयाग हॉस्पिटल येथे ७ जानेवारी रोजी रात्री ११ वाजता अखेरचा श्वास घेतला. डॉ. गाडगीळ यांच्या निधनाने पर्यावरण, जैवविविधता आणि परिसंस्था संवर्धनासाठी आयुष्यभर झटणारा एक प्रखर आवाज, अभ्यासू मार्गदर्शक आणि संवेदनशील शास्त्रज्ञ देशाने गमावला आहे. माधव गाडगीळ यांच्या निधनाने मोठी हानी झाल्याच्या प्रतिक्रिया दिग्गजांनी दिल्या, पण पुण्यात (झ्रींपश) त्यांच्या अंत्यसंस्काराला अवघे ४० ते ५० लोकच उपस्थित असल्याची खंत एका पत्रकाराने अनुभवातून व्यक्त केली आहे. त्यामुळे, पद्मभूषण पुरस्कारप्राप्त पर्यावरण शास्त्रज्ञांच्या अंत्यविधीबाबत शासन, प्रशासन किती उदासीन असल्याचं वास्तव समोर आले आहे.



पायपीट करीत दऱ्या, डोंगर, नद्या पालथ्या घालत पश्चिम घाट अहवाल तयार करणारा करून जंगल, जैवविधतता वाचविणारे 'पर्यावरण ऋषी' म्हणजे माधव गाडगीळ सर. त्यांच्या अहवालामुळे सिंधुदुर्गातील तब्बल ७० तरी मायनींग प्रकल्प रद्द झाले. नाहीतर सिधुदुर्गाचे पर्यावरण उध्वस्त होऊन आतापर्यंत मातेरे झाले असते. रत्नागिरीत सुद्धा काही मोठ्या निसर्गहानी करू शकणाऱ्या प्रोजेक्ट्सना माधव गाडगीळ सरांच्या अहवालानंतर ब्रेक लागला. सातत्याने अभ्यास करून पर्यावरण रक्षणासाठी झटणारा योद्धा आज आपल्यात नाही. मात्र, मरणानंतरही त्यांच्या अंत्यविधीने वेगळ्याच समाजाचं आणि कर्तव्यशून्य प्रशासनाचं दर्शन घडवलं आहे. सध्या सोशल मीडियावर एक पोस्ट व्हायरल झाली आहे, ती वाचून अनेकांनी संताप आणि खेद व्यक्त केलाय. पद्मभूषणने गौरवान्वित पर्यावरण तज्ञ, कोंकण ते केरळपर्यत पसरलेल्या पश्चिम घाटाच्या पर्यावरण संरक्षणासाठी आपली सारी हयात घालविणारे दिवंगत माधवराव गाडगीळ यांच्या अंत्ययात्रेचे वार्तांकन करण्यासाठी गेलेल्या केरळच्या मल्यालम मनोरमाचे फोटो एडिटर आर. एस. गोपन यांच्याबद्दलची - तड छालेवळीळ यांची ही पोस्ट आहे. जेमतेम ४०-५० जण पाहून हादरून जाऊन लिहिलेली ही पोस्ट. समाज म्हणून आपण पार रसातळाला पोहोचलो आहोत, हे दाखवून देणारी ही फेसबुक पोस्ट इंग्रजीत लिहिली आहे.

# सासवडच्या उपनगराध्यक्षपदी जगताप; निवडीत भाजपची शिवसेनेवर मात

**सासवड । प्रतिनिधी**

सासवड नगरपरिषदेची उपनगराध्यक्षपदाची निवडणूक व नामनिर्देशित सदस्य निवडणूकीसाठी पहिली सर्वसाधारण सभा पिठासीन अधिकारी तथा नगराध्यक्षा आनंदीकाकी चंद्रकांत जगताप यांच्या अध्यक्षतेखाली नगरपरिषदेच्या सभागृहामध्ये पार पडली. निवडीत मनोहर जगताप यांनी शिवसेनेच्या उमेदवारावर मात करीत उपनगराध्यक्षपदी विराजमान झाले. सचिन भोंडे व मयूर चौखंडे हे नामनिर्देशित सदस्य म्हणून बिनविरोध निवडून आले. शिवसेनेच्या वतीने उपनगराध्यक्षपदासाठी प्रितम म्हेत्रे व भाजपाच्या वतीने मनोहर जगताप यांची अर्ज दाखल केला. छाननीनंतर दोन्हीही अर्ज वैध असल्याने हात वर करून मतदान घेण्यात येणार असल्याचे नगराध्यक्षा जगताप यांनी सांगितले. मतदान प्रक्रियेनंतर म्हेत्रे यांना ९ मते व जगताप यांना १४ मते मिळाल्याने नगराध्यक्षा जगताप यांनी मनोहर जगताप यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याचे घोषित केले.



यावेळी नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष, नवनिर्वाचित नामनिर्देशित सदस्य व नवनिर्वाचित सदस्यांचा सत्कार नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी आमदार संजय जगताप यांनी नवनिर्वाचित उपाध्यक्ष व नामनिर्देशित सदस्यांचे अभिनंदन केले.

यावेळी मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, भाजपचे गटनेता अजित जगताप, सासवड नगरपरिषद शिवसेना पार्टीचे गटनेता मंदार गिरमे, नगरसेवक माधुरी राऊत, लीना वढणे, बाळासाहेब भिंताडे, शितल भोंडे, ज्ञानेश्वर जगताप, सोपान रणपिसे, स्मिता जगताप, सुहास म्हेत्रे, रत्ना जगताप, अर्चना जगताप, राजन जगताप, स्मिता उमेश, वैभव टकले, प्रितम म्हेत्रे, दीपाली जगताप, प्रदीप राऊत, प्रियांका जगताप, ज्ञानेश्वर गिरमे, शिल्पा जगताप, हेमलता ईनामके उपस्थित होते. कार्यालयीन अधीक्षक नूतन जाधव, सहायक कार्यालय अधीक्षक अतुल दिसले यांनी सभेचे कामकाज पाहिले.

नामनिर्देशित सदस्यपदी भोंडे, चौखंडे

शिवसेनेतर्फे गटनेता मंदार विजय गिरमे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे पत्र सादर करुन सचिन भोंडे यांच्या नावाची शिफारस केली होती. भाजपातर्फे गटनेता अजित जगताप यांनी नामनिर्देशित सदस्य पदासाठी मयूर चौखंडे यांच्या नावाची शिफारस केली. उमेदवारांचे अर्ज व छाननीचे पदनिर्देशित अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी यांनी काम पाहिले. दोन्हीही अर्ज वैध झाल्यानंतर सचिन भोंडे व मयूर चौखंडे हे नामनिर्देशित सदस्य म्हणून बिनविरोध निवडून आल्याचे घोषित केले.

# अजित पवार अन् महेश लांडगेंच्या वादात फडणवीसांची उडी

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबईनंतर आता राज्याचे राजकीय लक्ष पुणे जिल्ह्यातील दोन प्रमुख महापालिकांकडे वळले आहे. पुणे महानगरपालिका आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचारात वातावरण तापले असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपला लक्ष्य करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. यावरून भाजप नेत्यांनीही अजित पवारांना इशारा दिला आहे. मात्र, पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचे आमदार महेश लांडगे आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यातील वाकयुद्ध काही केल्या शांत होताना दिसत नाही.



महेश लांडगे यांनी अजित पवारांचा एकेरी उल्लेख करत 'आम्ही काय बांगड्या भरल्या नाहीत, जन्मत:च लंगोट घालणारे आम्ही आहोत' असे आव्हान दिले होते. आता या वादात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही उडी घेतली आहे. त्यांनी शेरो-शायरीच्या माध्यमातून अजित पवारांवर टीका करत महेश लांडगेंना शांत राहून विकासाच्या मुद्द्यावर बोलण्याचा सल्ला दिला आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये प्रचार सभेच्या निमित्ताने बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी नाव न घेता अजित पवारांवर निशाणा साधला. ते म्हणाले, आमचे महेश लांडगे जरा वैतागले होते, कारण निवडणुका आल्या की अनेकांना कंठ फुटतो. अनेकजण आरोप करत आहेत. मात्र मी सांगू इच्छितो की असे म्हणत फडणवीसांनी एक शायरी सादर करत टोला लगावला.

परिंदे को मिलेगी मंजिल एकदिन, ये उनके फैले हुये पंख बोलते है!

और वही लोग जो खामोश रहते है, अक्सर जमाने मे जिनके हुनर बोलते है !!

फडणवीस पुढे म्हणाले, आपलं काम बोलतंय, त्यामुळे हा वैताग आहे, हा त्रागा आहे, हा राग राग आहे. जरा समजून घ्या दादा, ते रागावले म्हणून तुम्ही रागावू नका. त्यांना सांगायला काम नाही. त्यांना अनेक प्रश्न विचारले जातात, त्यांच्याकडे उत्तरं नाहीत. त्यामुळे त्यांना आरोप-प्रत्यारोपात ही निवडणूक गुंतवून ठेवायची आहे. पण, आपण विकासाच्या मुद्यावर बोलत रहायला हवं. म्हणजे, आरोप-प्रत्यारोप करत बसण्याची वेळ येणार नाही. मुख्यमंत्री फडणवीसांनी महेश लांडगेंना थेट सल्ला देत म्हणाले, महेश दादा तुम्ही टीका करु नका, फक्त आपण केलेल्या कामांची आठवण करुन द्या. म्हणजे, टीका करण्याची गरज पडणार नाही. या सल्ल्यातून फडणवीसांनी महेश लांडगेंना वैयक्तिक टीकाकडे न वळता विकासाच्या कामांवर फोकस करण्यास सांगितले आहे. हे बोलणे अजित पवारांना अप्रत्यक्षपणे उत्तर असल्याचे मानले जात आहे, ज्यामुळे निवडणुकीत आरोप-प्रत्यारोपांऐवजी विकासाच्या मुद्द्यांना प्राधान्य देण्याचे संकेत दिले आहेत.

# वीसगावच्या विकासासाठी लागेल तेवढा निधी देऊ-संग्राम थोपटे

**भोर । प्रतिनिधी**

वीसगाव खोऱ्यातील विकास कामांसाठी आतापर्यंत अनेक कोटींचा निधी दिलेला आहे. या निधीच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधला आहे. वीसगाव खोरे (ता.भोर) परिसरातील जनता विकासभिमुख भाजपाच्या विचारांची असून देशात तसेच राज्यात भाजप सरकार असल्याने पुढील काळात उर्वरित विकास कामांसाठी लागेल तेवढा निधी उपलब्ध करून देऊ, असे प्रतिपादन माजी आमदार संग्राम थोपटे यांनी व्यक्त केले.

वीसगाव खोऱ्यातील वरोडी खुर्द येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणीपुरवठा ५ कोटी ४४ लाख रुपयांच्या योजनेचे उदघाट्न करताना भोर - वेल्हा - मुळशीचे माजी आमदार संग्राम थोपटे बोलत होते. यावेळी राजगड ज्ञानपीठ मानद सचिव स्वरूपा थोपटे, राजगड संचालक उत्तम थोपटे, खरेदी - विक्री संघ चेअरमन अतुल किंद्रे, भाजप जिल्हा युवामोर्चा सरचिटणीस अमर बुदगुडे, सरपंच शीतल संदीप भिलारे, उपसरपंच रोहिदास वरे, सदस्य सागर वरे, जयवंत वरे, राजाराम तुपे, विजय तुपे, अशोक तुपे, आनंदा वरे, बाळू पोळ, अशोक भिलारे आदींसह भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार थोपटे पुढे म्हणाले, पुढील काळात वीसगाव खोऱ्यातील जनतेचे प्रश्न प्राधान्याने सोडवण्याचे काम केले जाईल. तर वरोडी पाले परिसरातील दुरावस्था झालेल्या रस्त्यांचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार आहे. सर्वसामान्य, गोरगरिबांचा सर्वांगीण विकास हाच ध्यास मनी धरून भाजपा सरकारच्या माध्यमातून भरघोस निधी मिळवून वीसगाव खोऱ्याचा विकास साधला जाणार आहे. त्याप्रमाणे तरुणांच्या हाताला रोजगार मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातील.



# जारकरवाडीतील 'कापडदरा' रस्त्याचा वाद तब्बल २५ वर्षांनी मिटला



**मंचर । प्रतिनिधी**

जारकरवाडी (ता.आंबेगाव) येथील कापडदरा येथे बांधावरून असलेल्या वादातून गेली २५ वर्ष बंद असलेला रस्ता गुरुवार, दि. ८ रोजी तहसीलदार डॉ.सचिन वाघ यांनी दिलेल्या आदेशानुसार वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. रस्ता खुला झाल्यामुळे नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.

जारकरवाडी येथील कापडदरा येथे दोनशे ते अडीचशे लोकवस्ती असून त्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी व वाहतुकीसाठी असलेला रस्ता गेल्या वीस ते पंचवीस वर्षांपासून वादामुळे बंद होता. याबाबत नागरिकांनी मागील वर्षी तहसीलदार यांच्याकडे हा रस्ता खुला होणेबाबत तक्रारी अर्ज केला होता.

# आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे ऊसाचे एकरी उत्पादन वाढवा - दिलीप वळसे-पाटील

**मंचर । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसात समाजामध्ये नकारात्मकता येताना दिसत असून रामायण,महाभारत भागवत कथा यांच्या माध्यमातून ही नकारात्मकता दूर करता येते.जीवनाला एक नवी दिशा मिळवून देण्याचे काम धार्मिक ग्रंथ, कथा करत असतात.असे प्रतिपादन माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले. माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या गौरवप्रीत्यर्थ सोहळ्यानिमित्त मंचर मार्केटयार्ड येथे भव्य श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून हा धार्मिक सोहळा ज्ञानयज्ञासाठी गुरुवर्य श्रीकृष्ण कृपांकित डॉ.विकासानंद महाराज मिसाळ हे कथा व्यास म्हणून लाभले आहेत. मंचर बाजार समितीचे सभापती निलेश थोरात, संचालक मंडळ,बाजार समितीतील मार्केट यार्ड मित्र मंडळ,श्री गुरुदत्त प्रतिष्ठान,आडत व्यापारी असोसिएशन, तरकारी आडत व्यापारी असोसिएशन,हमाल मापाडी संघटना संचालक, कर्मचारी वृंद कृषि उत्पन्न बाजार समिती श्री दत्तकृपा ना.सह.पतसंस्था मर्या., मंचर कमर्शियल कॉम्प्लेक्स, व्यापारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने भागवत कथा संपन्न झाली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात भाविकांना मार्गदर्शन करताना माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील बोलत होते.



पुणे म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील,शरद बँकेचे अध्यक्ष देवेंद्र शहा,गणेशनाथ महाराज,ह.भ.प.पांडुरंग महाराज येवले,किरणताई वळसे पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील म्हणाले, की बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेले श्रीक्षेत्र भीमाशंकर आपल्याजवळ असून मंदिर परिसरात विविध विकास कामे भाविकांच्या सुख सोयीसाठी शासनाच्या माध्यमातून २२७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून विकास कामे सुरू झाली आहेत. तसेच उद्योजक देवेंद्र शहा यांच्या माध्यमातून एकलहरे येथे जैन धर्मियांचे मोठे तीर्थक्षेत्र उभे राहणार असून जवळपास २०० कोटी रुपये लोकवर्गणीतून गोळा करून हे तीर्थक्षेत्र उभे राहणार आहे. बाजार समितीचे सभापती निलेश स्वामी थोरात म्हणाले, माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील हे तालुक्याच्या भल्यासाठी ते काम करत असून त्यांनी त्यांचें आयुष्य हे तालुक्याच्या विकासासाठी खर्च केले आहे. त्यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सोहळा आयोजित केला आहे.